वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ६३८ विभाग :- आरोग्य विभाग

दिनांक :०५/१०/२०२०

विषय :- **घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी ५० टिपर तसेच १० कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी अर्थसंकल्पीय तरतुद वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी या लेखाशिर्ष मध्ये पुन:विनियोजन करणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र हे पालघर जिल्हयातील मोठे शहर असून ४ नगरपालिका, ५३ ग्रामपंचायती असे मिळून दि.०३ जूलै २००९ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या लगतचे शहर म्हणून या शहराची वाढ दिवसेंदिवस होत आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १२,२२,३९० एवढी आहे. सन २०१६ चे 'GIS व Consumer Survey' नुसार वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या १९,०१,२७३ एवढी आहे. सदरील लोकसंख्येत प्रती वर्षी मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ७,०२,२०२ एवढे निवासी, १,२२,०१६ एवढे वाणिज्य मालमत्ता आहेत. तसेच मनपा हद्दीत २२ भाजी मार्केट व २९ मासळी मार्केट आहेत.

तसेच वसई विरार शहरातील रस्ते ९२४ कि.मी. लांबीचे असून कचरा संकलन, रस्ते सफाई इत्यादी कामासाठी वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ९ प्रभाग समिती मध्ये २० झोन तयार करुन २० अभिकर्त्याची नेमणूक केली आहे. तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापना बाबतचे महत्व विचारात घेऊन राष्ट्रीय हरीत न्यायधिकरणात (NGT) दाखल मुळ याचीका क्रमांक १९९/२०१४ मध्ये दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजीच्या आदेशान्वये देशातील राज्यांना व केंद्रशासिक प्रदेशांना घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी बाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये खालीलप्रमाणे मनुष्यबळ, वाहने उपलब्ध आहेत.

अ.क्र	रस्ते सफाई मनुष्यबळ संख्या	कचरा संकलन मनुष्यबळ संख्या	मनपा मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	मनपा मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे डंपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे ट्रॅक्टर संख्या
१	१२५२	१३७४	५५	७०	२	४४	६४	२०

सदरील घनकचरा व्यवस्थापन मार्फत मनपा हद्दीतील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा वरीलप्रमाणे असणारे मनुष्यबळ व वाहने वापरुन प्रती दिवस सरासरी ६५० मेट्रीक टन कचरा क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो. त्यामध्ये प्रामुख्याने ओला कचरा, प्लॅस्टीक कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, घातक टाकाऊ कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपा क्षेत्रातील प्रत्येक गृह संस्थेकडून व्यवसायिक संस्था, खाजगी संस्था कार्यालये इत्यादी मालमत्ता मधून दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा (विघटनशील पदार्थ जसे अन्न, फळे, पालापाचोळा, भाजीपाला, मांस इत्यादी कचरा) व सुका कचरा (अविघटनशील पदार्थ जसे पुठ्ठा पेपर, रबर काचेच्या वस्तु, लाकूड, नारळाची करवंटी, शहाळी, प्लास्टिक, कापड, धातु जसे लोखंड, स्टिल इत्यादी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घरगुती विघातक कचरा (जसे सॅनिटरी नॅपकीन, डायपर, फुटलेल्या टयुबलाईट, बल्ब, थर्मामिटर कालबाहय, औषध, जंतुनाशक कंटेनर, पेंट कंटेनर, बॅटरी इत्यादी) यांचे संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून घेण्यात येत आहे.

तसेच रेस्टॉरन्ट, हॉटेल लग्न सभागृह उद्यान, भाजी-फळ मंडळ, तब्येलातील शेण, डेअरी येथील ओला व सुका कचरा वेगळा स्वतंत्रपणे संकलन करणे तसेच मनपा हद्दीतील खाजगी कत्तलखाने, मासळी बाजार, मटण दुकान येथील कचरा संकलन करणेकामी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सुका व ओला कचऱ्याचे विलगीकरण करणेकामी मनपाने २४० लीटर क्षमतेच्या ३७,००० नग HDPE डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत. परंतु शहरात वाढणाऱ्या दैनंदिन घनकचऱ्याच्या प्रमाणात वाढ होत असून मनपाने अतिरिक्त २४० लीटर क्षमतेच्या १५००० नग HDPE डस्टबीन्स खरेदी केल्या असून कचऱ्याचे वर्गीकरण मोठया प्रमाणात होणार आहे.

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या ५५ कॉम्पॅक्टर द्वारे शहरातील सर्व कचरा संकलन करणेकामी अपुरे पडत असल्याने नेमलेल्या ठेकेदारांमार्फत डंपर व ट्रॅक्टर द्वारे कचरा उचलावा लागतो. परंतु सदरचे डंपर हे बंदीस्त नसल्याने कचऱ्याची दुर्गंधी येणे, वाऱ्यावर कचरा उडून रस्त्यावर पडणे, अशा तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच सदर वाहनांवर होणारा खर्च देखील जास्त आहे. शिवाय अतिरिक्त मनुष्यबळ लावावे लागतात. त्याकरिता मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार अशा प्रकारचे डंपरचा वापर बंद करुन कॉम्पॅक्टर खरेदी केल्यास काम करण्यास सोयीचे होईल. याकरिता खालील वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

अ.क्र	वाहनांचा प्रकार	प्रति वाहन दर १८% GST व बॉडी बांधनिसह	खरेदी करावयाची वाहनांची संख्या	एकुण खर्च
१	टिपर (१.५ टन क्षमतेचे)	रु.१०,९०,०००/-	५० नग	रु.५,४५,००,०००/-
२	कॉम्पॅक्टर (चेसीस व बॉडी बांधणी सह)	रु.४२,००,०००/-	१० नग	रु.४,२०,००,०००/-
एकुण खर्च				**रु.९,६५,००,०००/-**

वरीलप्रमाणे शहरातील दैनंदिन निर्माण होणारा कचरा विलगीकरण करुन सुका व ओला कचरा उचलणे कामी वरील प्रमाणे असणाऱ्या वाहनांची आवश्यकता आहे. तरी ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टर खरेदीसाठी **रक्कम रु.९,६५,००,००० (अक्षरी रक्कम रु.नऊ कोटी पासष्ट लक्ष मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत असून सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षा मधून खरेदी करणे अपेक्षीत आहे.

परंतु घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी अर्थसंल्पातील वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी या लेखाशिर्ष मध्ये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात **रक्कम रु.३,७८,९०,८८६/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी अड्डयाहत्तर लक्ष नव्वद हजार आठशे श्याऐंशी मात्र)** एवढी रक्कम शिल्लक असून सदर शिल्लक रक्कमेतून उपरोक्त ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टर खरेदी करणे करिता तरतुद अपुरी असल्याने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **विकास विषयक कामांसाठी राखीव निधी (निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे)** या लेखाशिर्षा अंतर्गत **रक्कम रु.१००** कोटी तरतुदी मधून रक्कम **रु.१२ कोटी** सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षकामध्ये पुन:विनियोजन करणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :- घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी ५० टिपर तसेच १० कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून खरेदी करणेकामी अर्थसंकल्पीय तरतुद वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी या लेखाशिर्ष मध्ये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात **रक्कम रु.३,७८,९०,८८६/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी अठ्ठयाहत्तर लक्ष नव्वद हजार आठशे श्याऐंशी मात्र)** एवढी शिल्लक असून सदर शिल्लक रक्कमेतून उपरोक्त ५० नग टिपर व १० कॉम्पॅक्टर खरेदी करणे करिता तरतुद अपुरी असल्याने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **विकास विषयक कामांसाठी राखीव निधी (निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे)** या लेखाशिर्षा अंतर्गत **रक्कम रु.१००** कोटी तरतुदी मधून रक्कम **रु.१२ कोटी** सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षकामध्ये पुन:विनियोजन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाधरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र .९३९ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०५/७०/२०२०

प्रस्तावाचा विषय :-वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग 'सी' चंदनसार येथील चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) कोरोनाबाधीत तसेच संशायित रुग्णांकरीता विविध कामे करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी, चंदनसार येथिल चंदनसार हॉस्पीटल (ट्रामा सेंटर) कोरोनाबांधित/संशयित रुग्णांकरीता सर्व सोयीयुक्त आरोग्य केंद्र उभारणे आलेले आहे. आरोग्य केंद्र उभारणेच्या दृष्टीने सदर इमारतीमध्ये खालील प्रमाणे कामे करणे आवश्यक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव
१	चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) करीता आर.ओ यंत्रणा बसविणे	रु.४,१७,४२०/-	मे.संजय कंन्स्ट्रक्शन
२	चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) करीता इमारतीच्या उजवी बाजु, मागील बाजु, समोर बाजुस व गच्ची वर पत्रा शेड करणे आणि स्टेनलेस स्टील रेलिंग बसविणे व कोलॅबसीबल गेट बसविणे.	रु.९,२१,८१५/-	मे.रोशन राम जाधव
३	चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) करीता वेंटीलेटर स्सिटमचे मॉनिटर ठेवण्याकरीता लोखंडी रॅक बसविणे.	रु.७०,५६०/-	मे.राजभर कंन्स्ट्रक्शन
४	चंदनसार हॉस्पीटल(ट्रॉमा सेंटर) करीता एल.ई.डी ॲक्रॅलिक बोर्ड बसविणे.	रु.१,८७,५२५/-	मे.रोशन राम जाधव
५	चंदनसार हॉस्पीटल (ट्रॉमा सेंटर) करीता वॉटर कुलर व ट्रिपल सिंक बसविणे.	रु.२,५१,९००/-	मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस
	एकूण	रु.१८,४१,५२०/-	

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेले अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास व दरसूची मध्ये अंतभूर्त नसलेल्या बाबी करीता दरपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड, प्रकरण ५, संविदा - २ (२) नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदारांकडून राज्य दरसूचीतील दराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणे कामी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५४०

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक :०५/१०/२०२०

प्रस्तावाचा विषयः- प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाकरिता फर्निचर खरेदी करणेबाबत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ई, नालासोपारा कार्यालय वृंदावन गार्डन येथे नव्याने सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयामध्ये दैनंदिन कार्यालयीन कामकाज करण्यासाठी तसेच कार्यालयीन दस्तावेज ठेवण्यासाठी सहाय्यक आयुक्त यांनी फर्निचरची मागणी केलेली आहे. त्यानूसार प्रभाग समिती - ई कार्यालयात फर्निचर खरेदी करण्याचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले आहे. त्यानूसार कार्यालयीन फर्निचर तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर कामी कर्मचारी बसणे करीता व अधिकारी बसण्याची व्यवस्था तसेच अभिलेख ठेवण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे थेट उत्पादकाकडून खरेदीबाबत सोबत जोडलेल्या दरपत्रकाप्रमाणे खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र	तपशिल	आवश्यक नग	दर GST वगळून	एकुण
१.	डबल फेस मोबाईल युनिट	२	१२५९००	१२५९००
	सिंगल फेस फिक्स युनिट	१		
	डबल फेस मोबाईल युनिट विथ डोर	१		
२.	एम एस एल टाईप वर्क स्टेशन	१८	१४८००	२६६४००
	थ्री ड्रॉवर पेडेस्टल	१८	५२००	९३६००
	६ मॉडयूल प्लेटस	३६ सेट्स	११५०	४१४००
	हाय बॅक एक्झ्युटीव चेअर	१८	७८००	१४०४००
३.	डबल फेस मोबाईल युनिट	३	१०९७७०	१०९७७०
	सिंगल फेस फिक्स युनिट	१		
	डबल फेस मोबाईल युनिट विथ डोर	१		
४.	एम एस एल टाईप वर्क स्टेशन	३	१२५००	३७५००
	स्लायडिंग डोअर केबिनेट (साईज २.३ x ३ फुट)	३	९८००	२९४००
	हाय बॅक एक्सुकीटीव चेअर	३	७८००	२३४००
	व्हिझीटर चेअर	६	४५००	२७०००
	स्लायडिंग डोअर केबिनेट	३	११४००	३४२००

	(साईज ४ x १.५ फुट)			
५.	स्लायडिंग डोअर केबिनेट (साईज ६ x ३ फुट)	२०	१४५००	२९००००
			एकुण	१२१८९७०
			GST १८%	२१९४१४.६
			एकुण	१४,३८,३८५/-

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत फर्निचर / वॉटर कूलर इ. अंतर्गत या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त फर्निचर व्यवस्था प्रभाग समिती ई, नालासोपारा कार्यालय वृंदावन गार्डन येथे नव्याने खरेदी कावयाचे असून त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा में. जेटअेज इंडस्ट्रीज, वसई या उत्पादक कंपनीकडून तात्काळ थेट खरेदी करण्यांस येणाऱ्या रक्कम रु.१४,३८,३८५/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर फर्निचर व्यवस्था प्रभाग समिती ई, नालासोपारा कार्यालय वृंदावन गार्डन येथे नव्याने खरेदी करावयाचे असून प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक फर्निचर तात्काळ में. जेटअेज इंडस्ट्रीज, वसई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती ई, नालासोपारा कार्यालय वृंदावन गार्डन येथे फर्निचर खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रू. १४,३८,३८५/- (अक्षरी चौदा लक्ष अडतीस हजार तिनशे पंच्याऐशी मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १४९ विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक ०५/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) उपचार केंद्रावर अल्पोहार व भोजन व्यवस्था करण्यास जेवण्याचे कंटेनर व नाश्त्याचे फॉईल कंटेनर खरेदी केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन या रुग्णांवर उपचार करण्यासाठी मनपाने खालील ठिकाणी रुग्ण उपचार केंद्र सुरु केलेली आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रकार
१.	अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र	उपचार केंद्र
२.	जी.जी. कॉलेज कोविड ट्रीटमेंट सेंटर	उपचार केंद्र
३.	म्हाडा इमारत क्रं. १०	संशयित कोविड रुग्ण विलगीकरण केंद्र
४.	म्हाडा इमारत क्रं. १४	डॉक्टर, नर्स, कर्मचारी निवास
५.	बोळींज UPHC कोविड ट्रीटमेंट केंद्र	उपचार केंद्र
६.	बाभोळा अग्रवाल कोविड ट्रीटमेंट केंद्र	उपचार केंद्र
७.	श्री. जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार	कोविड उपचार रुग्णालय

वरील ठिकाणी उपचार केंद्र असून त्यामध्ये दैनंदिन रुग्णांना नाश्ता व जेवणाची व्यवस्था मनपा तर्फे करण्यात येते. यासाठी मोठया प्रमाणावर निधी खर्च होतो. शहरामधील जिवदानी देवी संस्थान, ओम साईधाम मंदीर ट्रस्ट, यंग स्टार्स ट्रस्ट, विवा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे मार्फत सदर ठिकाणी दैनंदिन नाश्ता व भोजन व्यवस्था पूरविण्यांत येते. सदरचे जेवण व नाश्ता पुरविणे करिता लागणारे फॉईल कंटेनर व जेवणाचे पाच खणी कंटेनर महापालिकेमार्फत पुरविण्यात येतात व रुग्णांना जेवण नाश्ता मोफत दिला जातो. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे होलसेलरकडून दि. ३०/०७/२०२० ते दि.२४/०८/२०२० या कालावधी मध्ये नाश्ता व जेवणाचे साहित्य खरेदी केलेले आहेत.

अं.क्र	साहित्याचा तपशिल	आवश्यक नग	किमंत(सर्व करासहित)	रक्कम
१.	नाश्ता कंटेनर (फॉईल कंटेनर २५० ग्रॅम)	३००००	१.२५/- प्रती नग	३७५००
२.	नाश्ता प्लास्टिक चमचा	२००००	०.३० पैसे प्रती नग	६०००
३.	पाच खणी जेवणाचा कंटेनर	२१६००	१०.५० प्रति नग	२२६८००
५.	ब्ल्यू एच एम बॅग ५१ मायक्रो २७ X ३० इंच	२०००	७.६० पैसे प्रती नग	१५२००
			एकुण	२,८५,५००/-

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत रुग्णालय स्टेशनरी खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य उपचार केंद्रावर नाश्ता कंटेनर, चमचा व इतर साहित्य खरेदी केलेले आहेत. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे.अरिहंत ट्रेडर्स, वसई यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु.२,८५,५००/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक साहित्य तात्काळ में. अरिहंत ट्रेडर्स. वसई हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रू. २,८५,५००/- (अक्षरी दोन लक्ष पंच्याऐशी हजार पाचशे मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १४२ विभाग: भांडार विभाग
दिनांक १५/३०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) उपचार केंद्रावर रुग्णांनाकरिता औषधे ठेवण्यासाठी रेफ्रीजरेटर खरेदी केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत कोविड-१९ साथीचे मोठया प्रमाणात रुग्ण सापडत असुन या रुग्णांवर उपचार करण्यासाठी नव्याने तयार करण्यात आलेले श्री जीवदानी देवी आय.सी.यु. रुग्णालय चंदनसार या ठिकाणी रुग्ण उपचार केंद्र सुरु केलेले आहे. सदर ठिकाणी कोविड-१९ RT PCR लॅबसाठी, पॅथॉलॉजी लॅबसाठी तसेच औषधे ठेवण्याकरीता व रुग्णांचे घेतलेले स्वॅप रेफ्रीजरेटर मध्ये ठेवण्यासाठी तोंडी मागणी वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी केलेली आहे. त्यानुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी रेफ्रीजरेटर खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार रेफ्रीजरेटर खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

सदर फ्रीजची किंमत खालीलप्रमाणे असुन त्या दराने २ नग रेफ्रीजरेटर तात्काळ खरेदी करणे आवश्यक आहे.

अं.क्र	मशीनचा तपशिल	दर प्रति नग	वाटाघाटी दर	आवश्यक नग	रक्कम (सर्व करासहित)
१.	गोदरेज कंपनी आर. डी. २१० लिटर क्षमता असलेले रेफ्रीजरेटर	१४९००	१४५००	२ नग	२९०००
				एकुण	२९,०००/-

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयातील उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा पुरवठादार डी.जी. वन इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि. यांचे कडून अत्यावश्यक असल्याने तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. २९,०००/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव:- महानगरपालिक्ष हद्दीमधील प्रभाग समिती (सी) अंतर्गत चंदनसार येथे नव्याने सुरु करण्यात आलेल्या श्री जीवदानी देवी रुग्णालय येथे पॅथॉलॉजी लॅबसाठी तसेच कोविड-१९ RT PCR लॅब करिता २ नग रेफ्रीजरेटरची तात्काळ आवश्यकता असल्याने विना ई-निविदा डी.जी. वन इलेक्ट्रानिक्स प्रा.लि. यांचे कडून रोखीने खरेदी केले व त्यासाठी लागणारी रक्कम रु. २९,०००/- श्री घनश्याम पाटील वरिष्ठ लिपीक भांडार विभाग यांनी स्वत: कडील अदा केली असल्याने सदरची रक्कम त्यांना अदा करण्यांस व झालेल्या रक्कम रु. २९,०००/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५४३ विभाग: भांडार विभाग
दिनांक ०५/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) करिता प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत प्रवेश निषेध क्षेत्रामध्ये बॅनर छपाई केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ साथ रोगाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. याकरिता कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी ज्या ठिकाणी (इमारत, गाव, सोसायटी) पॉझिटीव्ह रुग्ण आढळतात, त्या क्षेत्रामध्ये नागरिकांनी प्रवेश करु नये याकरिता महानगरपालिके मार्फत "प्रवेश निषेध क्षेत्र" बॅनर द्वारे सुचना लावण्यात करिता मा. आयुक्त साो. यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार प्र.सहा.आयुक्त यांनी मोठे कंन्टेनमेन्ट क्षेत्र "प्रवेश निषेध क्षेत्र" करण्यासाठी बॅनरची तोंडी मागणी वेळोवेळी केलेली होती. त्याप्रमाणे कोविड-१९ पॉझिटीव्ह रुग्ण आढळलेल्या ठिकाणी प्रवेश निषेध क्षेत्र बॅनर छपाई करुन पुरवठा केलेले आहेत.

त्याप्रमाणे मनपाच्या सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणे कामाची ई-निविदा दर प्रति चौ.फुट १७/- + १८% GST आहे. परंतु देशात लॉकडाऊन असल्याने मंजुर ठेकेदाराकडे फ्लॅक्स बॅनर चा रोल व मनुष्यबळ नसल्याने मंजूर निविदाराचे काम बंद आहे. त्यामुळे मनपा हद्दीतील फ्लॅक्स बॅनर छपाई करणारे मे. पुजा ग्राफीक्स यांच्याकडून खालील प्रमाणे वाटाघाटी करुन बॅनर छपाई करुन घेण्यात आले होते.

अ. क्र.	तपशिल	एकूण चौ. फुट	वाटाघाटीचा दर (प्र.चौ.फुट)	एकूण	GST १८%	एकूण खर्च रक्कम
१.	१६० जी.एस.एम.डिजीटल पी.व्ही.सी. ग्लॉक्सी फ्लेक्स बोर्ड	२८४१४	१२/-	३४०९६८	६१३७४	४०२३४२
					एकुण	४,०२,३४२/-

तरी सामान्य प्रशासन विभागामार्फत बॅनर छपाई करुन पुरवठा करणे निविदेमधील मंजूर दर १७ + १८% GST इतका आहे. तसेच मे. पुजा ग्राफीक्स हयांच्या सोबत वाटाघाटी अंती दिलेले दर रक्कम रु. १२ + १८% GST इतका असून सदर पुरवठादाराकडून बॅनर छपाई केल्यास मनपाच्या आर्थिक हिताचे होईल.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत रुग्णालय स्टेशनरी छपाई या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा मे. पुजा ग्राफीक्स यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ४,०२,३४२/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर बॅनर कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक बॅनर तात्काळ में. पुजा ग्राफीक्स हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना अंतर्गत प्रवेश निषेध क्षेत्रामध्ये बॅनर छपाई करणेकामी झालेल्या रक्कम रू. ४,०२,३४२/- (अक्षरी चार लक्ष दोन हजार तिनशे बेचाळीस मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १४४ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक ०५/ १० /2020

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महान रपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोवीड-१९ टेस्ट करणेकामी स्वतंत्र RT-PCR लॅबमध्ये लागणारी प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य ही प्राप्त दरपत्रकानुसार विनानिविदा खरेदी करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच या व्यतिरिक्त कोवीड-१९ चे प्रादुर्भाव रोखण्याकरीता महापालिका कार्यक्षेत्रात अलगीकरण कक्ष, विलगीकरण कक्ष, कोवीड हेल्थ सेंटर, समर्पित कोवीड हेल्थ सेंटर व अधिग्रहीत केलेले रुग्णालय नव्याने सुरु करण्यात आलेले असून कोवीड-१९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर चाचणीची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील कोवीड -१९ संशयित रुग्णांचे स्वॉब नमुना चाचणी करीता जे.जे रुग्णालय, हायकिन बायोफार्मास्युटिकल्स, मुबई येथे नियमितपणे पाठवावे लागतात. परंतू त्याठिकाणी कामाचा ताण अधिक असल्याकारणाने कोवीड संशयित रुग्णांचे चाचणी अहवाल विलंबाने प्राप्त होतात. सबब वैद्यकीय सेवा देणेकामी गैरसोय होत असल्यामुळे श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे RT-PCR लॅब सुरु करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ संशयित रुग्णांची चाचणी करणेकामी प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. M/s SCI-FI Biologicals, Pune यांच्यामार्फत सदर प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्याचे दरपत्रक प्राप्त झाले असून त्याचा तपशिल व मागणी खाली नमुद केलेली आहे. तरी सदर प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी करणे योग्य होईल.

अनु क्र	नाव	उत्पादीत कंपनीचे नाव कॅट नं	पॅकिंग	मागणी	प्राप्त दर	जी.एस.टी	एकुण रक्कम
१	Viral nucleic acid extraction kit v2.0	Geneombio technology GCPVNA2020	100	1	15300	१२%	15,300/-
२	Cryogenic vial, sterilized, Graduated	Genaxy GEN-CV-1.8ML-	50X10 Tubes	2	2825	१८%	5,650/-
३	Lightcycler 480 multiwell plate 96,white	Roche 04729692001	50 plate	6	40000	१८%	2,40,000/-

४	RM02 mini centrifuge 6000RPM	REMI RM02 PLUS	Each	1	8600	१८%	8,600/-
५	8-Strips pcr tub w/o cap 0.1ml Low profile ,cle	Genaxy GEN-0108-T-PC	1252 Strips	2	2925	१८%	5,850/-
६	8-Strips pcr cap 0.1ml Low profile tu ,clear	Genaxy GEN-0108-T-PC	125 Strips	2	1995	१८%	3,990/-
७	Clickseal mct tu 1.5ml natural	Genaxy GEN-0108-C-PC	500 tubes	2	450	१८%	900/-
						एकुण	2,80,452/-
						जी.एस.टी सहित एकुण रक्कम (१२% व १८%)	3,29,986.20/-

प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य विना निविदा M/s SCI-FI Biologicals, Pune यांच्याकडून खरेदी करण्यास रक्कम रू.३,२९,९८६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२०-२१ या वर्षाकरीता "रूग्णालयासाठी यंत्रे व इतर साधने" या भांडवली खर्चातील लेखाशिर्षाखाली तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी मा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार सदरची प्रयोगशाळा रसायने विनानिविदा खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेकामी मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे ५.२.२ कलम ६७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करण्यास येणाऱ्या रक्कम रू ३,२९,९८६/- (अक्षरी- रूपये तीन लाख एकोणतीस हजार नऊशे शहयाऐंशी मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी) 31/10/2020.
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४५ विभाग:- गोखिवरे

दिनांक: ०६/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या गोखिवरे विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील गोखिवरे विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा ठेका देण्यात येतो. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०५/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये ४३,२३,८८३/- (अक्षरी रुपये त्रेचाळीस लक्ष तेवीस हजार आठशे त्र्याऐंशी मात्र) या रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीकरिता रक्कम रुपये १९,८१,७८०/- व सदर रक्कमेवर १८% G.S.T. रुपये ३,५६,७२०/- सह अपेक्षित रु. २३,३८,५००/- (अक्षरी रुपये तेवीस लक्ष अडतीस हजार पाचशे मात्र) इतकी रक्कम गृहीत धरुन वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व ठेका देण्यास सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव:- वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षातील दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा मागविणेस व ठेका देण्याकरिता सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक ६/१०/२०

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४९ विभाग:- कामगार
दिनांक:०९/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या कामण विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील कामण विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा ठेका देण्यात येतो. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये ५,३७,२४०/- (अक्षरी रुपये पाच लक्ष सदोतीस हजार दोनशे चाळीस मात्र) या रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीकरिता रक्कम रुपये २,४६,२३५/- व सदर रक्कमेवर १८% G.S.T. रुपये ४४,३२२/- सह अपेक्षित रु. २,९०,५५७/- (अक्षरी दोन लक्ष नव्वद हजार पाचशे सत्तावन मात्र) इतकी रक्कम गृहीत धरुन वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व ठेका देण्यास सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव:- वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षातील दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा मागविणेस व ठेका देण्याकरिता सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४७ विभाग:- जुचंद्र
दिनांक:०६/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या जुचंद्र विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील जुचंद्र विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा ठेका देण्यात येतो. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये १८,१४,८११/- (अक्षरी रुपये अठरा लक्ष चौदा हजार आठशे अकरा मात्र) या रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीकरिता रक्कम रुपये ८,३१,७९०/- व सदर रक्कमेवर १८% G.S.T. रुपये १,४९,७२२/- सह अपेक्षित रु. ९,८१,५१२/- (अक्षरी रुपये नऊ लक्ष एक्याऐंशी हजार पाचशे बारा मात्र) इतकी रक्कम गृहीत धरुन वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व ठेका देण्यास सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव:- वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षातील दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा मागविणेस व ठेका देण्याकरिता सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

६/१०/२०२०
प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४८ विभाग:- सातिवली

दिनांक:०६/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या सातिवली विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील सातिवली विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा ठेका देण्यात येतो. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये ४९,९९,५००/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष नव्याण्णव हजार पाचशे मात्र) या रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीकरिता रक्कम रुपये २२,९१,४३७/- व सदर रक्कमेवर १८% G.S.T. रुपये ४,१२,४५९/- सह अपेक्षित रु. २७,०३,८९६/- (अक्षरी रुपये सत्तावीस लक्ष तीन हजार आठशे शहाण्णव मात्र) इतकी रक्कम गृहीत धरुन वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व ठेका देण्यास सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव:- वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षातील दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा मागविणेस व ठेका देण्याकरिता सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक ०६/१०/२०२०

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४४९ विभाग:- वालीव
दिनांक:०६/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या वालीव विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वालीव विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसूलीचा ठेका देण्यात येतो. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०५/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये ५३,८५,४१२/- (अक्षरी रुपये त्रेपन्न लक्ष पंच्याऐंशी हजार चारशे बारा मात्र) या रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ या ५ महिन्यांच्या कालावधीकरिता रक्कम रुपये २४,६८,३१४/- व सदर रक्कमेवर १८% G.S.T. रुपये ४,४४,२९७/- सह अपेक्षित रु. २९,१२,६११/- (अक्षरी रुपये एकोणतीस लक्ष बारा हजार सहाशे अकरा मात्र) इतकी रक्कम गृहीत धरुन वृत्तपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व ठेका देण्यास सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास खालीप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव:- वरीलप्रमाणे सन २०२०-२१ या वर्षातील दिनांक १/११/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ई-निविदा मागविणेस व ठेका देण्याकरिता सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक ६/१०/२०२०
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. १५०

विभाग :- आरोग्य विभाग

दिनांक :०९/१०/२०२०

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभूमी वरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया करुन विलगीकरण मशिन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.०३ जूलै २००९ रोजी झाली असून दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलनाचे काम घनकचरा व्यवस्थापन मार्फत करण्यात येते. सदरील कामासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रभाग निहाय २० झोन तयार करुन २० अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनपा क्षेत्रात कचरा संकलनाच्या कामासाठी खालीलप्रमाणे वाहने व मनुष्यबळ उपलब्ध आहेत.

अ.क्र	रस्ते सफाई मनुष्यबळ संख्या	कचरा संकलन मनुष्यबळ संख्या	मनपा मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	मनपा मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे डंपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे ट्रॅक्टर संख्या
१	१२५२	१३७४	५५	७०	२	४४	६४	२०

वरीलप्रमाणे कचरा संकलनासाठी वाहने व मनुष्यबळा मार्फत प्रति दिन ६०० टन कचरा गोखिवरे येथील क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो. परंतु सदरील कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने निपटारा करण्यासाठी सन २०१० पासून हंजर बायोटेक कंपनी कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती. परंतु सन २०१३ मध्ये जुन्या कचऱ्याला आग लागल्याने व आगीमुळे कंपनीचे मोठे नुकसान झाल्याने कंपनीने गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील कचऱ्यावर होणारी प्रक्रिया बंद केली आहे. त्यामुळे शहरात निर्माण होणारा दैनंदिन कचरा गोखिवरे येथील क्षेपणभूमीवर कोणतीही प्रक्रिया न करता टाकण्यात येत आहे. यामुळे सदर ठिकाणी मागील ७ वर्षात अंदाजे ६ ते ८ लक्ष टन कचरा विना प्रक्रिया जमा झालेला आहे.

परंतु नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापना बाबतचे महत्व विचारात घेऊन राष्ट्रीय हरित न्यायधिकरणात (NGT) दाखल मुळ याचीका क्रमांक १९९/२०१४ मध्ये दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजीच्या आदेशान्वये देशातील राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना घनकचरा व्यवस्थापन

नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी बाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार कचरा व्यवस्थापन करताना ओला कचरा, प्लॅस्टीक कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, घातक टाकाऊ कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपा क्षेत्रातील प्रत्येक गृह संस्थेकडून व्यवसायिक संस्था, खाजगी संस्था, कार्यालये इत्यादी मालमत्ता मधून दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा (विघटनशील पदार्थ जसे अन्न, फळे, पालापाचोळा, भाजीपाला, मांस इत्यादी कचरा) व सुका कचरा (अविघटनशील पदार्थ जसे पुठ्ठा पेपर, रबर काचेच्या वस्तु, लाकूड, नारळाची करवंटी, शहाळी, प्लास्टिक, कापड, धातु जसे लोखंड, स्टिल इत्यादी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घरगुती विघातक कचरा (जसे सॅनिटरी नॅपकीन, डायपर, फुटलेल्या ट्युबलाईट, बल्ब, थर्मामिटर कालबाहय, औषध, जंतुनाशक कंटेनर, पेंट कंटेनर, बॅटरी इत्यादी) यांचे संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून विलगीकरण करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच रेस्टॉरन्ट, हॉटेल, लग्न सभागृह, उद्यान, भाजी-फळ मंडळ, तब्येलातील शेण, डेअरी येथील ओला व सुका कचरा वेगळा स्वतंत्रपणे संकलन करणे तसेच मनपा हद्दीतील खाजगी कत्तलखाने, मासळी बाजार, मटण दुकान येथील कचरा संकलन करणेकामी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सुका व ओला कचऱ्याचे विलगीकरण करणेकामी मनपाने २४० लीटर क्षमतेच्या ३७,००० नग HDPE डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत. तरी मागील ७ ते ८ वर्षात शहरात दैनंदिन निर्माण झालेला कचरा अभिकर्ता नेमून क्षेपणभूमीवर विलगीकरण मशीन बसवून जुन्या कचऱ्याची १००% विल्हेवाट लावणेकामी येणारा खर्च फार जास्त असल्याने (अंदाजे ३५ कोटी) मनपाच्या मालकीचे विलगीकरण मशिन असल्यास सदरचे काम सोयीचे व कमी खर्चीक असल्याने सदर विलगीकरण मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. सदर मशिन खरेदी करिता अंदाजे ३ ते ४ कोटी खर्च होऊ शकतो. तसेच विलगीकरण करुन स्वतंत्र झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे देखील अडचणीचे नसल्याने सदरची मशीन खरेदी केल्यास डम्पींग ग्राऊडवरील जमा झालेला अंदाजे ६ ते ८ लक्ष टन कचरा पुढील एक ते दिड वर्षात विलगीकरण करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्याकरिता महानगरपालिके मार्फत १० नग (३०० टन) प्रती दिवस प्रती मशीन विलगीकरण करणारे मशिन (Segregating Trommel of ३०० TPD Capacity Processing Legacy Solid Waste) खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर १ नग मशिनचे संपूर्ण सेट अप करणेकामी अंदाजे रक्कम रु.३५ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. त्यानुसार १० नग मशिन खरेदी करुन त्याचे सेट अप करणे कामी **रक्कम रु.३ कोटी ५० लक्ष (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी पन्नास लक्ष मात्र)** खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **साफसफाई साहित्य खरेदी** या लेखाशिर्षावरील तरतुद **५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करुन विल्हेवाट लावण्याकरिता विलगीकरण मशीन (Segregating Trommel of ३०० TPD

Capacity for Processing Legacy Solid Waste) खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील जुन्या कचऱ्याचे विलगीकरण करुन विल्हेवाट लावण्याकरिता महानगरपालिके मार्फत १० नग (३०० टन) प्रती दिवस प्रती मशीन विलगीकरण करणारे मशिन (Segregating Trommel of ३०० TPD Capacity for Processing Legacy Solid Waste) ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेकामी **रक्कम रु.३ कोटी ५० लक्ष (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी पन्नास लक्ष)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 6/10/2020.
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४५१ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :०६/१०/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेच्या कामकाजासाठी पहिल्या टप्यात तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या ए.एन.एम. व जी.एन.एम. वर्गाची सेवा समाप्ती करुन त्यांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय वसई व विजयनगर तुळींज रुग्णालय नालसोपारा अशी २ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. महानगरपालिकेने वैद्यकीय आरोग्य विभागाचे कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालवधी साठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करणे कामी आवश्यक पद निर्मिती करणेस व आवश्यक ती प्रक्रिया करुन पुढील कार्यवाही करणेस तसेच महानगरपालिकेमध्ये पुर्वी पासुन कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पदावर नियुक्ती कामी विहित केलेली वयोमर्यादेची अट न ठेवणेस मा. सर्वसाधारण सभा दि.१३/१२/२०१९ ठराव क्र.११ अन्वये मान्यता दिलेनुसार सदरच्या पदावर आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२६/०२/२०२० ते २८/०२/२०२० रोजी थेट मुलाखती घेण्यांत आलेल्या होत्या तथापी याच दरम्यान कोव्हीड-१९ चा उद्रेक सुरु झाल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अमलबजावणीचे वैद्यकीय आरोग्य विभागाकडील अतितात्काळ महत्वाचे कामकाज सुरु असल्याने सर्व कर्मचारी वर्ग याकामी कार्यरत आहे. मा.आयुक्त यांनी दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मोठया प्रमाणात आरोग्य कर्मचाऱ्यांची आवश्यकता पडत असल्याने यास्तव मुलाखत प्रक्रियेच्या वेळी पालघर जिल्हातील व परिसरातील येण्यास तयार असलेल्या उमेदवारांना तातडीने ६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यास व साथ रोग नियंत्रण कायदा १८९७ च्या अनुषंगाने व शासनाच्या दि.१४/०३/२०२० च्या आदेशान्वये सदर नियुक्ती करणेस मान्यता दिलेली आहे. तथापि कोव्हीड-१९ चा कालावधी असल्याने सदर कालावधीत कोणत्याही प्रकारच्या महानगरपालिकेच्या सभेचे आयोजन झालेले नसल्याने याकामी सदर कालावधीत अथवा तद्नंतर कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा ठराव घेण्यांत आलेला नाही. यानुसार या कोव्हीड-१९ चे कामकाजासाठी मा. आयुक्त यांच्या दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दिलेल्या नियुक्ती आदेशानुसार (सोबत प्रपत्र अ)पहिल्या टप्यात १९- जी.एन.एम. रु. ३४,८००/- व ३६- ए.एन.एम. रु.१९,७००/- या ठोक मानधनावर दि.०७/०४/२०२० ते दि.-०३/०६/२०२० या कालावधीत ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेल्या आहेत. यानुसार संबंधीतांच्या ६ महिन्याचा कालावधी हा दि.०६/१०/२०२० ते दि.०२/१२/२०२० या कालावधीत विविध दिनांकास समाप्त होत आहे. सबब कोव्हीड-१९ चे प्रतिबंधात्मक उपाययोजनेची कामकाजासाठी जी.एन.एम.

व ए.एन.एम. या पदावरील कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने याकामी खालील बाबीवंर निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) मा. आयुक्त यांच्या दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दिलेल्या आदेशानुसार १९ जी.एन.एम. रु.३४,८००/- व ३६ ए.एन.एम. रु.१९,७००/- दि.०७/०४/२०२० ते दि.०३/०६/२०२० या कालावधीत ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेल्या आहेत. सदर कालावधीत अथवा तद्नंतर कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा ठराव घेण्यांत आलेला नाही. याकामी कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

२) सबब यानुसार वरील परिच्छेदात नमुद ३६- ए.एन.एम. व १९- जी.एन.एम. यांचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी हा दि.०६/१०/२०२० ते दि.०२/१२/२०२० या कालावधीत विविध दिनांकास संपणार असल्याने या सर्वाचा समाप्तीचा कालावधी हा कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने साधारणत: माहे ०६ ऑक्टोबर २०२० रोजी या एकाच दिवशी समाप्त करणे आवश्यक आहे. व तसा संबंधीतांना सेवा समाप्तीचा आदेश निर्गमित करणे योग्य होईल.

३) तसेच वरील अ.क्र.२ मध्ये नमुद केलेल्या ३६- ए.एन.एम. व १९-जी.एन.एम. वर्गाची सेवा दि.०६/१०/२०२० रोजी समाप्त केलेनंतर त्यांना दि.०७/१०/२०२० रोजी एक दिवसांचा तांत्रिक खंड देणेस व संबंधीतांना दि.०८/१०/२०२० रोजी पासून पुढील ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. व तसा संबंधीतांना कामकाजकरणे कामी मुदतवाढीचा आदेश निर्गमित करणे योग्य होईल.

यानुसार वरील अ.क्र. १ ते ३ च्या बाबीसाठी मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरच्या बाबी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत मा.आयुक्त यांच्या दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दिलेल्या आदेशानुसार पहिल्या टप्यात दि.०७/०४/२०२० ते दि.०३/०६/२०२० या कालावधीत ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेल्या ३६- ए.एन.एम. व १९- जी.एन.एम. यांना सदर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी व येणाऱ्या संपुर्ण खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच याच ३६ ए.एन.एम. व १९ जी.एन.एम. वर्गाचा ६ महिन्याचा सेवा कालावधी हा दि.०६/१०/२०२० या एकाच दिवशी समाप्त करणेस व दि.०७/१०/२०२० रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच कोव्हिड-१९ चे कामकाजाची अत्यावश्यकता लक्षात घेवून याच पहिल्या टप्यात नियुक्त केलेल्या ३६- ए.एन.एम. व १९-जी.एन.एम. यांना दि.०८/१०/२०२० पासून पुढील ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणेत येत आहे. वरील सर्व कामकाजासाठी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) 6/10/2020.
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. १५२

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :२६/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' ते 'आय' मधील विविध ठिकाणी लोखंडी जाळीचे झाकणे बसविणे.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ७५,६२,४०१/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६३ दि. १९/०८/२०२० (पृष्ठ क्र. प/५४५ ते प/५४९)

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/२६०/२०२० दि. १९/०८/२०२०
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. २१/०८/२०१८ (पृष्ठ क्र.प/५५१ते प/५५९)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. सकाळ, दै. नवाकाळ, दै. नरवीर चिमाजी, दै. खबरे आजतक, दै.नवभारत, दै. इकॉनॉमिक टाईम्स, दै. फ्री प्रेस जर्नल

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. २१/०८/२०२० दु. ३:०० पासुन ते दि. १४/०९/२०२०
दु.३:०० पर्यत

विहीत मुदतीत ऑन लाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ९

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. १५/०९/२०२० दु. ३:०० वाजता

ई-टेण्डरींग व्दारे लखोटा क्र. २ उघडण्याची तारीख :- दि. २३/०९/२०२०

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता

२) शहर अभियंता

विहित मुदतीत लखोटा क्र. २ मध्ये खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले असुन ते पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदाधारकांचे नाव	प्राप्त निविदा दर अंदाजपत्रकीय रक्कमेवर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१	**मे. अफताब इन्फ्रा.**	**०.००%**	---	---
२	**मे.ओमकार एंन्टरप्रायजेस**	**०.००%**	---	---
३	**मे. संजय पंडीत**	**(+)१४.९४%**	---	---
४	**मे. श्री. गणेश एंटरप्रायजेस**	**(-)१.००%**	---	---
५	**मे. शुभ लक्ष्मी एंटरप्रायजेस**	**०.००%**	---	---
६	**मे. स्पेक्ट्रम कन्स्ट्रक्शंन**	**०.००%**	---	---
७	**मे. विजय अनंता मोहिते**	**(+)२.००%**	---	---
८	**मे. विशाल दिलीप गुप्ता**	**(-) १४%**	**डी डी. क्र. ०२११८३, दि.२९/०९/२०२० पावती क्र.८६१५१२ दि. ३०/०९/२०२० रक्कम. ३,७८,२००/-**	---

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. विशाल दिलीप गुप्ता** यांचे निविदेतील दर **अंदाजपत्रकापेक्षा (-) १४% कमी** दर प्राप्त झाले आहेत.

मे. विशाल दिलीप गुप्ता यांना **जा.क्र. वविशम/बांध/३७०/२०२० दि. २५/०९/२०२०** रोजी **वाटाघाटी** संदर्भात चर्चा करणेकामी पत्र देण्यात आले असून त्यांच्या सोबत **दि. २८/०९/२०२०** रोजी वाटाघाटी संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यांनी आपले निविदेतील भरणा केलेले दर **वाटाघाटी अंती** कमी व योग्य असल्याचे कळविले आहे. तरी **मे. विशाल दिलीप गुप्ता** यांचे **वाटाघाटी अंती** दर योग्य व कमी असल्याने **मा. निविदा समितीपुढे** ठेवणेस मंजूरीस्तव सादर.

अ.क्र.	लघुत्तम निविदा धारकांचे नाव	प्राप्त निविदा दर अंदाजपत्रकीय रक्कमेवर	वाटाघाटी अंती प्राप्त दर
१	**मे. विशाल दिलीप गुप्ता**	**(-) १४%**	**(-) १४%**

मे. विशाल दिलीप गुप्ता यांचे निविदा दर **वाटाघाटी अंती** सर्वात कमी व योग्य असल्याने मंजुरीस्तव सादर तसेच **मा.** आयुक्त सो . यांच्याशी दि.३०/०९/२०२० रोजी सदर प्राप्त निम्नत्तम दरावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून त्यांनी **मे. विशाल दिलीप गुप्ता** यांच्या निविदा दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सदर कामास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी विषय/ठराव क्र. ६३ दि. १९/०८/२०२० अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या मे. विशाल दिलीप गुप्ता ह्यांचा निविदा दर लघुत्तम आहे. या ठरावान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्याअनूषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४५३ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ०७ / १० / 2020

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 94 मधील मौजे- नवाळे गावालगतची स्मशानभूमी दुरूस्ती करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग समिती (ई) वॉर्ड क्र.94 मधील मौजे-नवाळे गावालगतची स्मशानभूमी दुरूस्ती करणेबाबत मा. सहा. आयुक्त यांनी जा.क्र. /व.वि.श.म./ आस्था/ 323/20-21 दि. 02/07/2020 च्या पत्राद्वारे आदेश दिलेला आहे.

त्यानुसार सदरच्या कामाची स्थळ पाहणी दि. 03/07/2020 रोजी करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी गेट, शेड, कंपाऊंड वॉल दुरूस्ती इ. कामे आढळून आलेली आहेत.

त्यानुसार सदर कामाचे रक्कम रू. 4,98,859/ इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग समिती (ई) वॉर्ड क्र.94 मधील मौजे-नवाळे गावालगतची स्मशानभूमी दुरूस्ती करणे	रू. 4,98,259/-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४५४

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०७/ ४०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१, २०२१-२२ या व्दिवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्‌भव २० द.ल.ली. योजनेतील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पर्पींग मशिनरी व जल शुद्धीकरण केंद्रामधील यांत्रीकी व विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे.

प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजीत रक्कम :- रु. ५०,००,०००/- (सन २०२० ते सन २०२२)

वर्षे	रक्कम रु.
माहे जानेवारी २०२१ ते मार्च २०२१	रु. १५ लक्ष
माहे एप्रिल २०२१ ते मार्च २०२२	रु. ३५ लक्ष

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या उसगाव / शिरवली उद्‌भव योजने अंतर्गत २० द.ल.ली. पाणी पुरवठा होत आहे. सदर योजनेअंतर्गत उसगाव येथे १२५ HP क्षमतेचे २ VT पंप, शिरवली येथे १७५ HP क्षमतेचे २ VT पंप आहेत. तसेच पारोळ येथील जलशुद्धीकरण केंद्रामध्ये १८० HP क्षमतेचे ५ Centrifugal पंप व १२० HP क्षमतेचा १ Centrifugal पंप आहे. प्रत्येक पंपासाठी NRV, Butterfly Valve तसेच Sluice Valve आहेत. पारोळ येथील जलशुद्धीकरण केंद्रामधिल इतर यांत्रिकी बाबींचा ही सामावेश आहे. सदरचे पंप व व्हॉल्व सततच्या वापराने नादुरुस्त होत असतात त्यामुळे वेळोवेळी Servicing, Overhauling करणे आवश्यक आहे.

सन २०१७-२०२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता उपरोक्त कामी मे. ऐ. आर. एंन्टरप्रायजेस यांच्या लघुत्तम दरास मंजूरी प्राप्त आहे. सदर कामाची मुदत दि. ३१/०३/२०२० पर्यंत असून निविदेअंतर्गत माहे मार्च २०२० पर्यंत होणारा अपेक्षित खर्च गृहीत धरुन एकूण खर्च रु. ४९.२८ लक्ष असून निविदेअंतर्गत रु. ५५.७२ लक्ष इतकी बचत होणार आहे. त्यामुळे उपरोक्त कामी नविन निविदा कार्यवाहीस सरासरी २ महिन्यांचा कालावधी लागणे अपेक्षित असल्याने मागील मंजूर ठेकेदार यांचे कडुन कामे करुन घेतल्यास महानगरपालिकेची गैरसोय टाळता येणार आहे. त्यामुळे मागील मंजूर ठेकेदार मे. ए. आर. एंटरप्रायझेस यांना दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

सदर कामी सन २०२०-२०२२ करीता नविन ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक असून सन २०२०-२१ मध्ये रु. १५ लक्ष व सन २०२१-२२ करिता रु.३५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा प्रस्तावित "उसगाव योजना देखभाल दुरुस्ती " या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामीसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे. तसेच मे. ए. आर. एंटरप्रायझेस यांच्या मागील मंजूर निविदेस कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता मुळ वित्तीय मान्यतेच्या अधिन राहून दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ देणे कामी मा. आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- सन २०२०-२१, २०२१-२२ या व्दिवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. योजनेतील सब स्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पपींग मशिनरी व जल शुद्धीकरण केंद्रामधील यांत्रीकी व विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन पुढील निविदा कार्यवाहीस मंजूरी असे. तसेच नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मे. ऐ. आर. एन्टरप्रायजेस यांच्या मंजूर निविदेस कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता मुळ वित्तीय मान्यतेच्या अधिन राहून दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजूरी असे.

मा. आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६५५ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-०७/ ६०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१, २०२१-२२ या व्दिवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना सुर्या उद्भव १०० द.ल.ली. (सुर्या टप्पा-१ व ३) व उसगांव/शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहीन्याची देखभाल दुरुस्ती करणे.

प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजीत रक्कम :- रु. १,६१,५०,४३४/- (सन २०२० ते सन २०२२)

वर्षे	रक्कम रु.
माहे जानेवारी २०२१ ते मार्च २०२१	रु. ३२,३०,०८७/-
माहे एप्रिल २०२१ ते मार्च २०२२	रु. १,२९,२०,३४७/-

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेस सुर्या उद्भव (सुर्या टप्पा-१ व ३) योजनेअंतर्गत २०० द.ल.ली व उसगांव/शिरवली उद्भव २० द.ल.ली. असा एकूण २२० द.ल.ली. पाणी पुरवठा होत असुन वसई विरार शहरास पाणी पुरवठा सुस्थितीत ठेवण्याकरीता सदर योजनेच्या जलवाहीनींची देखभाल दुरुस्ती करणे तसेच जलवाहीन्यांवरील Air Valve ची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सद्य:स्थितीत सुर्या टप्पा - १ योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे करीता मंजूर निविदेची मुदत ही दि. ०३/०८/२०२० रोजी संपुष्टात आली आहे. तसेच उसगांव योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे करीता मंजूर निविदेची मुदत दि. ३०/०९/२०२० रोजी संपुष्टात आली आहे. तसेच सुर्या टप्पा - ३ योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे करीता कोणतीही निविदा मंजूर नाही. त्यामुळे तीनही योजनेच्या जलवाहिन्या नादुरुस्त झाल्यास गैरसोय निर्माण होणार आहे.

सन २०१७-२०२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता उपरोक्त कामी मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांची लघुत्तम दराची निविदा मंजूर आहे. सदर कामाची मुदत दि. ०३/०८/२०२० पर्यंत असून निविदेअंतर्गत माहे डिसेंबर २०१९ पर्यंत रुक्कम रु. २,१४,८६,६०८/- इतका खर्च झाला आहे. उपरोक्त कामी नविन निविदा कार्यवाहीस सरासरी २ महिन्यांचा कालावधी लागणे अपेक्षीत असल्याने मागील मंजूर ठेकेदार यांचेकडुन कामे करुन घेतल्यास महानगरपालिकेची गैरसोय टाळता येणार आहे. त्यामुळे मागील मंजूर ठेकेदार मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांना दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

सदर निविदेअंतर्गत मंजूर ठेकेदारास मुदवाढ दिल्यास सुर्या (टप्पा १ व २) जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती कामी माहे जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० पर्यंत अंदाजे रक्कम रु. ५२ लक्ष, सुर्या (टप्पा ३) करीता अंदाजे रु. ५ लक्ष व उसगाव योजनेकरीता माहे ऑक्टोबर २०२० पासुन माहे डिसेंबर २०२० पर्यंत अंदाजे रु. १० लक्ष असा एकूण तीनही योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करीता मुळ निविदेवर रक्कम रु. ६७ लक्ष खर्च होणार आहे. त्यामुळे मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांना ३१ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ दिल्यास मंजूर निविदेअंतर्गत रक्कम रु.२,८१,८६,६०८/- इतका खर्च अपेक्षीत असून सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

तरी सुर्या उद्भव (टप्पा-१ व ३) २०० द.ल.ली व उसगाव/शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहीन्याची देखभाल दुरुस्ती करीता सन २०२०-२०२२ करीता नविन ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे तिनही योजनेंच्या जलवाहिन्यांच्या देखभाल दुरुस्ती करीता एकाच ठेकेदाराची नियुक्ती केल्यास सदर कामी सन २०२०-२१ मध्ये रु. ३२ लक्ष व सन २०२१-२२ करिता रु.१.२९ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा प्रस्तावित " सुर्या योजना देखभाल दुरुस्ती " व "उसगांव योजना देखभाल दुरुस्ती " या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय बी/१ प्रकारची निविदा मागविण्यास व होणाऱ्या अनूषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे. तसेच मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांच्या मागील मंजूर निविदेस कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ व मुदतवाढअंती निविदेवर होणारा अपेक्षीत खर्च गृहीत धरुन रक्कम रु. २,८१,८६,६०८/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे आवश्यक असून मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- सन २०२०-२१, २०२१-२२ या व्दिवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना सुर्या उद्भव १०० द.ल.ली. (सुर्या टप्पा-१ व ३) व उसगांव/शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहीन्याची देखभाल दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,६१,५०,४३४/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असुन पुढील निविदा कार्यवाहीस मंजूरी असे. तसेच नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मे. के. आर . कंन्स्ट्रक्शन यांच्या मंजूर निविदेस कोणतीही मुल्यवर्धीत भाववाढ न देता दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ व मुदतवाढअंती निविदेवर होणारा अपेक्षीत खर्च गृहीत धरुन रक्कम रु. २,८१,८६,६०८/- खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३५६

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या पाणी पुरवठा (टप्पा-३) योजनेअंतर्गत विरार नालासोपारा दरम्यान ५६/१२ B-१३ येथे अंथरण्यात आलेल्या ६११ मी.मी. व्यासाच्या मृदुपोलादी (M.S.) जलवाहिनीची गळती दुरुस्ती करणे.
प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा विषय :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस वाढीव १०० द.ल.ली. सुर्या टप्पा - ३ पाणी पुरवठा योजना तयार करणे कामी मा.सर्वसाधारण सभा दि.१३/०८/२०१२ ठराव क्र.१७ व दि.१५/०९/२०१२ ठराव क्र.१८ अन्वये रु. ३५०/- कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो-२०१३/प्र.क्र. ३०७/नवि-३३ दि.२७/०१/२०१४ अन्वये प्रकल्पास शासनाची प्रशासकीय मान्यता आहे. सदर योजनेचे मंजूर ठेकेदार मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांना जा.क्र. वविशम/काअ/पापु/७११/१३-१४ दि.२६/०२/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आला असून त्यांच्या मार्फत योजनेची कामे पुर्ण करुन घेण्यात आली आहेत. सदर योजनेची कामे करण्यासाठी आवश्यक त्या शासकीय/ निमशासकीय विभागाच्या परवानग्या प्राप्त करुन देणे इत्यादी कामे महानगरपालिकेमार्फत करावयाची असल्याने सदर योजनेची ६११ मी.मी. व्यासाची MS जलवाहिनीस पश्चिम रेल्वेच्या विरार नालासोपारा दरम्यान ५६/१२ B- १३ येथे १२०० मी.मी. व्यासाच्या केसींग पाईप मधून क्रॉसिंग करणे कामी जा.क्र.वविशम/शअ/पापु/२७५/१५ दि.२८/०२/२०१५ अन्वये प्रस्ताव पश्चिम रेल्वेकडे सादर करुन आवश्यक शुल्क रेल्वे प्रशासनाकडे भरणा करण्यात आले आहे. तसेच याकामी पश्चिम रेल्वेच्या पॅनलवरील प्रकल्प नियोजन सल्लागार म्हणून मे. राईट्स प्रा.लि. यांची नियुक्ती करुन मंजूर ठेकेदारामार्फत रेल्वे क्रॉसिंगचे काम पूशींग मेथडव्दारे पुर्ण करुन घेऊन नालासोपारा पश्चिम भागातील पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता.

सदर रेल्वे क्रॉसिंग करण्यात आलेल्या जलवाहिनीस रेल्वे ट्रॅकच्या मधोमध गळती लागल्याचे निदर्शनास आले असून नालासोपारा पश्चिमेकडील भागात पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करणे शक्य होत नसल्याने सदर गळती लवकरात लवकर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांचे योजनेचे काम पुर्ण झाल्याने त्यांच्याकडे सद्य:स्थितीत सदर गळती दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक यंत्र सामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने सदरचे काम त्वरीत

करणे शक्य नसल्याचे मा. शहर अभियंता यांच्या दालनात झालेल्या बैठकीत प्रकल्प व्यवस्थापक, GECPL यांनी सांगीतले आहे.

सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना सुर्या उद्भव १०० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्याची देखभाल दुरुस्ती करणे कामी मंजुर ठेकेदार मे. के.आर.कन्स्ट्रक्शन यांस कडून त्यांच्या मंजूर दराने सदर काम करुन घेतल्यास पाणी पुरवठा सूरळीत ठेवण्यास मदत होणार आहे. सद्य:स्थितीत नेमकी गळती कशामुळे झाली व त्याचे प्रमाण किती आहे याबाबत अंदाज घेता येत नसल्याने याकामी ढोबळ रु. २५ ते ३० लक्ष खर्च अपेक्षित असल्याचे गृहित धरुन मे. के.आर. कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देऊन काम करुन घेतल्यानंतर प्रत्यक्ष येणारा खर्च मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांच्या अंतिम देयकातून किंवा महानगरपालिकेकडील जमा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करुन घेणे योग्य होईल.

त्याअनुषंगाने मा. आयुक्त साो, यांची टी./१ दि. ३०/०४/२०२० अन्वये मान्यता घेण्यात येऊन जा.क्र. व.वि.श.म./शअ/पा.पु/३५/२० दि.३०/०८/२०२० रोजी मे. के.आर. कन्स्ट्रक्शन यांना आदेश देण्यात आला. त्याअनुषंगाने मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन तातडीने काम पुर्ण करुन घेण्यात आले आहे. सदर कामी रक्कम रु. २५.६६ लक्ष इतका खर्च झाला असून मे.के.आर.कन्स्ट्रक्शन यांनी दि. ३०/०५/२०२० रोजी देयकही सादर केले आहे. सदरचा खर्च हा मे.के.आर.कन्स्ट्रक्शन यांच्या मुळ निविदेअंतर्गत भागविणे शक्य नसल्याने स्वतंत्र प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

तरी उपरोक्त कामी मे. के.आर. कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या कामास व अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीसह देयक अदा करण्यास तसेच सदरचा खर्च हा मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांच्या अंतिम देयकातून अथवा मनपाकडील जमा सुरक्षा अनामत रक्कमेतुन वजा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या पाणी पुरवठा (टप्पा-३) योजनेअंतर्गत विरार नालासोपारा दरम्यान ५६/१२ B-१३ येथे अंथरण्यात आलेल्या ६११ मी.मी. व्यासाच्या मृदुपोलादी (M.S.) जलवाहिनीची गळती दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मे. के.आर. कन्स्ट्रक्शन यांनी केलेल्या कामास व अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीसह मे. के. आर. कंन्स्ट्रक्शन यांना देयक अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च हा मे. घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांच्या अंतिम देयकातून अथवा मनपाकडील जमा सुरक्षा अनामत रक्कमेतुन वजा करणेस मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४५८ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- धुकटण जलशुध्दीकरण केद्रातील नाल्याव्दारे वाहणाऱ्या निरुपयोगी पाण्यामुळे तसेच जलवाहिनी / एअर वॉलच्या गळतीमुळे झालेल्या नुकसान भारपाईबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहरास सुर्या टप्पा १ व २ अंतर्गत १०० द.ल.ली प्रतिदिन पाणी पुरवठा होत असुन सदर योजनेचे मासवण येथे उद्चंन केंद्र व धुकटण येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. धुकटण जलशुध्दीकरण केंद्र येथून पाणी शुध्द करण्यात येऊन काशिद कोपर मुख्य संतुलीत टाकी (MBR) पर्यंत मृदु पोलादी जलवाहिनी अंथरण्यात आली आहे. सदरची जलवाहिनी ही धुकटण, बहाडोली, खामलोली, दहीसर अशा गावांमधून अंथरण्यात आली आहे. सुर्या टप्पा - १ व २ १०० द.ल.ली. क्षमता योजना सन २००५ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत कार्यान्वीत करण्यात आली असुन सन २००९ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकणा कडून वसई विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

धुकटण येथील जलशुध्दीकरण केंद्रामध्ये पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम वापरण्यात येतो. तसेच फिल्टर बेडच्या वॉशिंगच्या वेळी Waste Water तयार होतो. सदरचे Waste Water ॲलम मिश्रीत पाणी हे जलशुध्दीकरण केंद्राच्या बाहेरील बाजुकडुन नदिकडे जाणाऱ्या अस्तित्वात असलेल्या नैसर्गिक पावसाळी नाल्यामध्ये सोडण्याचे नियोजन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत करण्यात आले. सदरचा नाला हा खाजगी जागेतून जात असून त्यातुन फक्त पावसाळ्यात पाणी वाहत होते व उर्वरीत कालावधीत सदरचा नाला हा कोरडा असायचा.

सुर्या टप्पा १ योजना कार्यान्वीत केल्यानंतर धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातुन निघणारे ॲलम मिश्रीत पाणी हे सन २००५ - ०६ मध्ये योजना कार्यान्वीत झाल्यापासुन ते आजतागायत सदरच्या नाल्यामधुनच विसर्ग होत आहे. सदरचे पाणी हे ॲलम मिश्रीत असून आजु बाजूच्या शेतामध्येही पसरते. सदर रसायन मिश्रीत पाण्यामुळे जमीन नापीक होत आहे असे शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

दि. ३१/०१/२०२० रोजी धुकटण गावाचे स्थानिक ग्रामस्थ यांनी सदरच्या नाल्यामध्ये माती भराव करुन बांध तयार केला. सदरच्या बांधामुळे जलशुध्दीकरण केंद्रामधुन बाहेर पडणारे Waste Water साचुन आजुबाजुच्या परिसरातील शेतजमीनीमध्ये पसरण्यात सुरुवात झाली असुन शेतकऱ्यानी लावलेल्या शेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदरचे शेतकरी संतप्त होऊन धुकटण जलशुध्दकरण केंद्र बंद करण्याबाबत मागणी करत होते.

श्री. सुरेंद्र ठाकरे, उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी, कनिष्ठ अभियंत्यासह प्रत्यक्ष कार्यस्थळी जाऊन पाहणी केली असता, तेथील शेतकऱ्याचे म्हणणे आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदरचा नाला करतेवेळी कोणालाही विश्वासात घेतले नसुन अस्तित्वातील नाला हा प्रत्यक्षात पावसाळी नैसर्गिक नाला होता. परंतू जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत केल्यापासुन सदरचा नाला हा १२ महिने वाहत असून व नाल्यामधील ॲलम मिश्रीत पाण्यामुळे शेतीचे नुकसान होऊन शेतजमीन नापीक होत चालल्याची तक्रार आहे. तसेच सदर बाबतीत सन २०१० पासून (पृष्ठ क्र. ०५ ते ३९) त्यांनी महापालिकेकडे पाठपुरावा करुन सुध्दा त्यांच्या प्रश्नांची महापालिकेने दखल घेतलेली नसल्याकारणाने सदरचा नाला हा बंद केलेला असून यापुढे आमच्या जमिनीतुन जलशुध्दीकरण केंद्राचे अशुध्द पाणी सोडू नये अशी मागणी केलेली आहे.

सदर ठिकाणी झालेल्या शेतीचे नुकसान व ग्रामस्थाचा रोष पाहता सदर नुकसानीचे महसुल व कृषि विभागाकडुन सर्व्हेक्षण करुन घेण्यात येईल. असे आश्वासन तत्कालीन शहर अभियंता, श्री. माधव जवादे, पाणी पुरवठा विभाग यांनी ग्रामस्थांना दिले आहे व त्यानुसार ग्रामसेविका, तलाठी व कृषि अधिकारी यांनी संयुक्तपणे बाधित शेतकऱ्यांचा पंचनामा (पृष्ठ क्र. १८३ ते १९३) केला असून कृषि अधिकाऱ्यांमार्फत बाधित क्षेत्रानुसार वार्षिक अनुज्ञेय नुकसान भरपाईची रक्कम कळविण्यांत आली आहे. (पृष्ठ क्र. १९५)

तसेच धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातून काशिद कोपर पर्यंत अंथरण्यांत आलेली शुध्द पाण्याची जलवाहिनी / एअर वॉल वेळोवेळी लिकेज होवून सदरच्या लिकेज मुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे व बाधित शेतकऱ्यांची नुकसान भारपाईची रक्कम ही कृषि अधिकारी मार्फत कळविण्यांत आली आहे. (पृष्ठ क्र. १९७ ते २२५)

तालुका कृषि अधिकार, पालघर यांनी खालील तपशीला प्रमाणे नुकसान भरपाईबाबत कळविले आहे.

- धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातुन नाल्याव्दारे वाहणारे निरुपयोगी पाणी सदर कुटुंबाने नाल्यामध्ये मातीभराव करुन बांध तयार केला आहे. सदरचा बांध हा त्यांच्या जागेत तयार केला आहे. धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातुन नाल्याव्दारे वाहणाऱ्या निरुपयोगी पाण्यामुळे गेल्या १५ वर्षापासून झालेल्या नुकसान भरपाईची मागणी बाधीत शेतकरी करीत आहेत व त्याप्रमाणे त्यांनी महानगरपालिकेसोबत

पत्रव्यवहारही केला आहे. परंतू सदर शेतकऱ्यांची मागील ७ वर्षाप्रमाणे मुल्यांकन केल्यास नूकसान भरपाईची रक्कम खालील प्रमाणे.

अ. क्र.	शेतकऱ्यांची नावे	स.नं.	७/१२ प्रमाणे क्षेत्र	बाधित क्षेत्र	वार्षिक नुकसान भरपाईची रक्कम	एकूण देय रक्कम
१	सविता गणपत पाटील	१२१/१/१ अ, १२८/३	२.५८.०	२.१५.०	१,४५,१२५/-	१०,१५,८७५/-
२	सुरेश गणपत पाटील					
३	रमेश गणपत पाटील					
४	दिलीप गणपत पाटील					
५	महेंद्र पद्माकर पाटील					
६	माणिक सोमायाा घरत	१०६/ १०४/३	२.०४.८	०.२३.०	१५,५२५/-	१,०८,६७५/-
७	नारायण पांडुरंग पाटील	१२८/२, १२२/ ३,१२२/५	०.७०.४	०.२९.०	१९,५७५/-	१,३७,०२५/-
८	सदानंद पांडुरंग पाटील					
९	काळुराम पांडुरंग पाटील					
१०	हेमंत पांडुरंग पाटील					
११	शकुंतला गोपिनाथ पाटील					
१२	नितिन तुकाराम पाटील					

- धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातुन नाल्याव्दारे वाहणाऱ्या निरुपयोगी पाणी ग्रामस्थांनी नाल्यामध्ये बांध तयार केल्यामुळे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांची नावे खालीलप्रमाणे.

अ. क्र.	शेतकऱ्यांची नावे	स.नं.	७/१२ प्रमाणे क्षेत्र	बाधित क्षेत्र	एकूण देय रक्कम (रु.)
१	कृष्णा नारायण वझे	१२९/९	०.६०.१	०.०५.१	३,४४३/-
२	राजेंद्र दामोदर वझे	१०४/२	०.८४.०	०.०७.०	४,७२५/-
३	लहु पांडुरंग गायकवाड	१०१/५,१०१/७	१.१७.८	०.६०.०	४०,५००/-
४	नितिन वासुदेव पाटील	१२१/१,१३१/३११८/२,१३५/५	१.२०.०	०.२६.०	१७,५५०/-
५	नरेश वासुदेव पाटील	३१३/१,११८/४	०.१३.७	०.१३.०	८,७७५/-
६	विलास हरी कुडू	१३१/११,१३१/४,१३१/१३	१.१२.२	०.२०.०	१३,५००/-
७	परशुराम लक्ष्मण कुडू	१३१/११,१३१/४,१३१/१३	१.१२.२	०.२७.०	१८,२२५/-
८	नरोत्तम परशुराम कुडू	१३१/६	२०.०	०.१३.०	८,७७५/-
९	कृष्णा नारायण वझे	१२१/९,११९	१.५५.१	०.३०.०	२०,२५०/-
१०	जयवंत नारायण वझे	१२१/९,११९	१.५५.१	०.२०.०	१३,५००/-
११	गोविंद नारायण वझे	१२१/९,११९	१.५५.१	०.२२.०	१४,८५०/-
१२	सुनंदा नरेश भोईर	१२८/१ क	०.५५.०	०.१५.०	१०,१२५/-
१३	अंतू शिवा भोईर	१२८/१ ब,१३०/४	०.८३.०	०.२६.०	१७,५००/-
१४	सुर्यकांत चिंतामण पाटील	१३१/६,१३१/८	०.४८.८	०.०८.०	५,४००/-
१५	नरेश वासुदेव पाटील	१२१/२	०.२६.३	०.१५.०	१०,१२५/-
१६	दमयंती दत्तात्रेय सातवी	३०/२	०.६९.०	०.१७.०	११,४७५/-
१७	चंद्रकांत सुकूर कुडू	१३१/७	०.२६.३	०.११.०	७,४२५/-
१८	लहु पांडुरंग गायकवाड	१०१/५,१०१/७	१.१७.८	०.६०.०	४०,५००/-
१९	मुकेश नागजीभाई लोडलिया	१०२/१	१.५६.३	०.१७.०	११,४७५/-
२०	पांडुरंग दामोदर वझे	१०१/२ अ,१०३/२	१.४६.९	०.२७.०	१८,२२५/-

अ.क्र.	शेतकऱ्यांची नावे	स.नं.	७/१२ प्रमाणे क्षेत्र	बाधित क्षेत्र	एकूण देय रक्कम (रु.)
२१	बुधाजी सोमया घरत	१२०,१०८/२	१.५६.२	०.२६.२	१७,६८५/-
२२	बाळकृष्ण ठकाजी पाटील	१२१/१/१ ब	०.५०.०	०.१३.०	८,७७५/-
२३	मोहन ठकाजी पाटील				
२४	मनोहर ठकाजी पाटील				
२५	पुंडलिक ठकाजी पाटील				
२६	संतोष ठकाजी पाटील				

- धुकटण जलशुध्दीकरण केंद्र ते काशीद कोपर पर्यंत अंथरण्यात आलेली शुध्द पाण्याची जलवाहिनी अथवा त्यावरील एअर वॉलच्या गळतीमुळे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	शेतकऱ्यांची नावे	स.नं.	एकूण देय रक्कम	नुकसानीचा प्रकार
१	हेंमत दिपक तरे	११२/२/अ	१,४९,५००/-	जलवाहिनी गळतीचे पाणी घरात जाऊन घरातील सामानाचे नुकसान
२	विजय शिवराम पाटील	१४/३ अ व ३२/१	६२,३९९/-	Air Valve गळतीमुळे शेतीचे नुकसान
३	अशोक दत्तु पाटील	२१५/१/क, ८४/५, ८५/२	अपेक्षित खर्च ५०-६० हजार	Air Valve गळतीमुळे शेतीचे नुकसान
४	शरद हिरा पाटील	२२७/३/ब	अपेक्षित खर्च ८०-९० हजार	जून्या योजनेच्या जलवाहिनी गळतीमुळे शेतीचे नुकसान
५	गोदावरी हरिश्चंद्र घरत	१७८/१/६ व १७८/१/५	अपेक्षित खर्च ९०-९५ हजार	Air Valve गळतीमुळे शेतीचे नुकसान
६	कमल काशिनाथ पाटील	३५/३	६०,०००/-	सन २०१७ मध्ये जलवाहिनी गळतीमुळे झालेल्या नुकसान भरपाई ची मंजूर रक्कम कौटुंबीक वादामुळे अदा करण्यात आली नव्हती.
७	सुकरीबाई माधव पाटील	११३ ,११४	३,२०,०००/-	

सदर बाधीत शेतकऱ्यांची एकूण रक्कम रू. २४,२१,२७७/- इतकी होत असून सदरचा खर्च हा सन २०२०/२१ च्या अर्थसंकल्पातील " सुर्या योजना देखभाल दुरुस्ती" या लेखा शिर्षातून भागविणे शक्य असून सदरच्या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- धुकटण जलशुध्दीकरण केंद्रातील नाल्याव्दारे वाहणाऱ्या निरुपयोगी पाण्यामुळे तसेच जलवाहिनी / एअर वॉलच्या गळतीमुळे झालेल्या नुकसान भारपाई कामी एकूण रक्कम रु. २४,२१,२७७/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे. तसेच बाधीत शेतकऱ्यांना जाचपडताळणी करुन अनुज्ञेय रक्कम अदा करण्यास मंजूरी असे.

11/10/2020

मा. आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. -पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७५८ विभाग:- बोळींज

दिनांक:- ९/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- सन २०२०-२१ हया मधील दि.१ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ व सन २०२१-२२ (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२) एकुण १५ महिने पर्यत वित्तीय वर्षाकरीता प्रभाग समिती ऐ, बोळींज कार्याक्षेत्रातील दैनंदिन बाजार व आठवडे बाजार कर वसुलीची ई-निविदा व जाहिर नोटीस प्रसिध्दी करीता प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- प्रभाग समिती ऐ, बोळींज अंतर्गत दैनंदिन बाजार व आठवडे बाजार भरविले जातात. तसेच विविध प्रकारचे बाजार (ओले-सुकी मासे मार्केट, फुल मार्केट, खेळणीवाले, फुगेवाले, भाजीवाले, वडापाववाले, सुका फरसाणवाले इ.) रस्त्याच्या कडेला व गल्लीबोळयात बाजार भरविले जातात. सदरच्या बाजार कराची ठेका पध्दतीने वसूली केली जाते. सन २०२०-२०२१ वर्षाची कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे बाजार ठेका रद्द करून माहे दि.०७/१०/२०२० ते दि.३१/१२/२०२० पर्यत ठेकेदारांस मुदतवाढ दिली असून सदरची मुदतवाढ ठेका माहे दि.३१/१२/२०२० रोजी संपत असून तद्नंतर माहे १ जानेवारी २०२१ ते माहे ३१ मार्च २०२१ तसेच सन २०२१-२०२२ (१ एप्रिल २०२१ ते दि.३१ मार्च २०२२ पर्यत) एकुण १५ महिने या वित्तीय वर्षाकरीता ठेका पध्दतीने ई-निविदा प्रक्रियेव्दारे बाजार कर वसुली करण्यासाठी सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरीता मागणी खालीलप्रमाणे असे.

अ.क्र	ठिकाण	सन २०१९-२० ची मागणी रक्कम	सन २०२०-२०२१ची मागणी रक्कम	१ जाने.२०२१ ते ३१ मार्च २०२१ ची ३ महिने मागणी रक्कम (१०% वाढ सह)	१०% वाढ	एकुण सन २०२१ -२२ ची मागणी (१५ महिने)
१	प्रभाग समिती ऐ, बोळींज	५०,४०,०००/-	५५,४४,०००/-	१३,८६,०००/-	५,५४,४००/-	७४,८४,४००/-

सन २०२०-२०२१ ची मागणी रक्कम रू.५५,४४,०००/- या रक्कमेवर १०% वाढ करून येणारी रक्कम रू.५,५४,४००/- तद्नंतर माहे १ जाने. २०२१ ते ३१ मार्च २०२१ ची रक्कम रू.१३,८६,०००/- व सन २०२१-२०२२ ची मागणी रक्कम रूपये ५५,४४,०००/- एकुण रूपये ७४,८४,४००/- रक्कम होत आहे. या रक्कमेवर ठेका पध्दतीने ई-निविदा व जाहीर नोटीस प्रसिध्द करून प्राप्त निविदा रक्कमेवर १८% GST लावणे बाबत सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर.

ठरावाचा निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए, बोळींज कार्यक्षेत्रात दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुल करणेकामी ठेका नियुक्त करण्यासाठी दि.१ जानेवारी २०२१ ते दि.३१ मार्च २०२२ (१५ महिने) या कालावधीसाठी रूपये ७४,८४,४००/- या मागणी रक्कमेवर वार्षिक ई-निविदा मागविणेस व मंजूर रक्कमेवर १८% GST आकारणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती ऐ, कार्यक्षेत्रात दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुल करणेकामी ठेका नियुक्त करण्यासाठी दि.१ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२२ (१५ महिने) कालावधीसाठी रक्कम रु.७४,८४,४००/- मागणी रक्कमेवर वार्षिक ई- निविदा मागविणे व मंजूर रक्कमेवर १८% GST आकारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७५९

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- ७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभागसमिती व इतर कार्यालय/विभागांना संगणक संच, लॅपटॉप, यु.पी.एस, प्रिंटर, स्कॅनर, झेरॉक्स मशिन, तसेच इतर संगणकीय साहीत्य ई- निविदाद्वारे एजन्सी नियुक्त करुन खरेदी करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती, ३ रुग्णालय, २१ नागरी सुविधा केंद्रे व ६ अग्निशमन कार्यालये, नव्याने स्थापन करण्यात आलेले कोव्हिड सेंटर्स व इतर कार्यालय कार्यरत आहेत. सदर कार्यालयांअतर्गत जन्म मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, आवक-जावक, बजेट कंट्रोल व फाईल ट्रॅकींग, टॅली – अकाऊंटींग इत्यादी कामकाज केले जातात. तसेच केंद्र शासनाच्या पी. एम. स्वनिधी, माझे कुटूंब माझी जबाबदारी या योजना तसेच नव्याने स्थापन करण्यात आलेले जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, ऑनलाईन आर. टी. आय, नविन स्वच्छ भारत कक्ष, आरोग्य आस्थापना विभाग याकरीता संगणक, प्रिंटर वइतर संगणकीय साहीत्यांची आवश्यकता आहे.

महानगरपालिकेतील बहुतांश विभागातील जुने संगणक व प्रिंटर यांमध्ये वारंवार तांत्रीक बिघाड येत असुन काही संगणक, प्रिंटर हे पुर्णपणे नादुरुस्त झालेले आहेत. सद्यस्थितीत सर्व प्रभागांमधील सहा. आयुक्त यांनी व विभाग प्रमुख यांनी दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता संगणक, प्रिंटर, स्कॅनर, झेरॉक्स मशिन व इतर संगणकीय साहित्यांची नविन मागणी केलेली आहे.

शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती-०७/प्र.क्र.८९/३९ मंत्रालय दि. ०१/०८/२०११ नुसार महानगरपालिकेतील कालबाह्य झालेले संगणक, प्रिंटर व इतर संगणकीय साहीत्यांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया चालू आहे. सदर मागणीनुसार महानगरपालिके अंतर्गत दैनंदिन कामकाज सुरळीत व गतिमान होणेकामी संगणक, यु.पी.एस, प्रिंटर, स्कॅनर व इतर संगणकीय साहीत्य खरेदी करुन पुरविण्याचे मा. आयुक्त यांनी निर्देश दिले आहेत.

सद्यस्थितीत विविध विभागांतुन आलेल्या मागणी नुसार आवश्यक साहीत्यांचा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	संगणक/ लॅपटॉप	प्रिंटर	यु.पी.एस	झेरॉक्स मशिन	प्रिंटर विथ स्कॅनर
१	प्रभाग समिती (ए)	७	५	१०		१
२	प्रभाग समिती (बी)	७	५	१०	१	१
३	प्रभाग समिती (सी)	६	४	१०	१	१
४	प्रभाग समिती (डी)	६	३	८		१
५	प्रभाग समिती (ई)	२	२	४	१	१
६	प्रभाग समिती (एफ)	८	५	१२		१

७	प्रभाग समिती (जी)	८	५	१२		१
८	प्रभाग समिती (एच)	४	४	८	१	१
९	प्रभाग समिती (आय)	८	६	१४	१	१
१०	आस्थापना विभाग	२	२	६		
११	घरपट्टी विभाग मुख्यालय	१	१	१		
१२	पाणीपट्टी विभाग मुख्यालय	२	१	२		
१३	STP, बोळींज	१	१	१		
१४	विद्युत विभाग मुख्यालय	१	१	२		
१५	माहिती तंत्रज्ञान विभाग	३ PC/ २ Laptop	२	५		१
१६	आरोग्य विभाग स्वच्छ भारत कक्ष	२	१	२		१
१७	बांधकाम विभाग मुख्यालय	२	१	२		
१८	जाहीरात विभाग मुख्यालय	१	१	१		
१९	आरोग्य विभाग स्वच्छ भारत ए ते आय	५		५		
२०	लेखा विभाग मुख्यालय	१२	३	१५		
२१	वैद्यकीय आरोग्य केंद्र	८	४	१२		
२२	परिवहन विभाग	२	२	२		
२३	नगरसचिव विभाग	२	१	४		१
	एकुण	**१०२**	**६०**	**१४८**	**५**	**१२**

वरील तक्त्या प्रमाणे सदर साहित्य खरेदी करणेकामी अंदाजित खर्च पुढील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	**साहित्याचे नाव/ तपशिल**	**प्रमाण**	**प्रति नग अंदाजित रक्कम (सर्व करांसहीत)**	**एकुण अंदाजित रक्कम**
१	संगणक (Desktop) I5 10th gen, 8GB RAM, 1TB HDD, OS Win 10, DVD writer, 19.5" LED, 3 year onsite warranty	१००	५१,९८९/-	५१,९८,९००/-

२	लॅपटॉप I5 10th gen, 8GB RAM, 256GB SSD + 1TB HDD, OS Win -10, 2GB graphics card, 3 year onsite warranty	२	५९,४८९/-	१,१८,९७८/-
३	प्रिंटर Monochrome, Single function, Print Speed Up to 15 ppm, Duty Cycle – Monthly 5000 Pages	६०	१३,५००/-	८,१०,०००/-
४	प्रिंटर विथ स्कॅनर Print scan copy, Monochrome wireless, connectivity - high speed USB 2.0, ADF, Duplex Print	१२	२०,०००/-	२,४०,०००/-
५	यु.पी.एस 600 VA, Line interactive UPS	१४८	१,९००/-	२,८१,२००/-
६	झेरॉक्स मशिन Laser – monochrome, Monthly 2000 - 7500 pages, Max Copying Speed Up to 45 ppm, ADF	५	१,००,०००/-	५,००,०००/-
			एकुण	**७१,४९,०७८/-**

वरील प्रमाणे साहित्य खरेदी करणे कामी एकूण अंदाजित रक्कम रु.७१,४९,०७८/- इतका खर्च अपेक्षीत असुन सदर खर्च लेखासांकेतांक ०४१-४१७२-१ 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी वित्तीय वर्ष २०२०-२१ करीता उपरोक्त साहीत्य ई निविदा प्रक्रियाद्वारे खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती व इतर कार्यालय/विभागांना संगणक संच, लॅपटॉप, यु.पी.एस, प्रिंटर, स्कॅनर, झेरॉक्स मशिन, तसेच इतर संगणकीय साहीत्य ई- निविदेद्वारे एजन्सी नियुक्त करुन खरेदी करणेकामी होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्र.स."सी"

दैनंदिन बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र. ९६० **दिनांक :- १२/१०/२०२०**

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका चंदनसार कार्यक्षेत्रातील चंदनसार येथील दैनंदिन घाऊक बाजार फी वसुल करणे.

वर्ष:- सन. २०१९-२०

प्रस्तावाचा मजकूर :- ठेकेदाराचे नांव :- रामकैलाश यादव

कालावधी :- दि. २१/१२/२०१९ ते दि. २०/१२/२०२०

निविदा रु. :- ३९,००,००६/-

प्रत्येक्ष जमा रु.:- १९,५०,००३/-

थकबाकी रु.:- १९,५०,००३/-

थकबाकी रक्कम भरणा करणे करीता जा.क्र.प्रससी/१४/२०-२१ दि. १५/०६/२०२० रोजी नोटीस.

ठेकेदारानी कोव्हिड-१९ च्या संसर्गामुळे लॉकडाऊन काळात वसुली केली नसल्यानी मंजुर रक्कमेत ६०% सुट मिळणेबाबत दि. ३१/०८/२०२० च्या पत्राने विनंती.

ठेकेदारानी केलेल्या करारनाम्या मध्ये अट क्र. २ मध्ये नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार बंद झाल्यास महापालिकेकडून नुकसान भरपाई मागता येणार नाही. अशी अट असल्याने सुट देता येत नाही.

वर्ष :- सन २०२०-२०२१

कालावधी :- दि. २१/१२/२०२० ते दि.२०/१२/२०२१

निविदा रु. १०% वाढीने :- ४२,९०,००६/-

सन. २०२०-२०२१ करिता ई-निविदा करणेंस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सादर.

निर्णय :- प्रस्तावित केल्याप्रमाणे थकबाकी वसुलीची कायदेशिर कारवाई करावी व पुढील दि. २१/१२/२०२० ते दि.२०/१२/२०२१ या एक वर्षाच्या कालावधी करिता रु. ४२,९०,००६/- इतक्या रक्कमेवर ई-निविदा मागविणेंस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक

वसई विरार शहर महानगपालिका

P-41

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५११०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६७ विभाग : बांधकाम

दिनांक : ०३/१०/२०२०

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित तसेच संशयित रुग्णाकरीता नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या विलगीकरण कक्ष (Isolation Ward) व अलगीकरण कक्ष (Quarantine Ward) मध्ये बांधकामाशी संबंधीत अनुषंगिक कामे करणेकामी प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

२) प्रस्तावाचा मजकूर :-

देशभरात कोरोना (Covid-19) या विषाणुच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या करीता, करोना बाधित व संशयित रुग्णाच्या प्रथमोपचाराच्या उपचारासाठी विलगीकरण कक्ष (Isolation Ward)/अलगीकरण कक्ष (Quarantine Ward) मध्ये तात्काळ सुविधा प्राप्त करुन घेण्याबाबत मा. आयुक्त सो., यांनी दि. २८/०३/२०२० रोजी आदेशित केले आहे.

तथापि मा. जिल्हाधिकारी सो. यांना पालघर जिल्हयात दि. १२/०३/२०२० रोजी "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कायदा" लागु केला आहे. जिल्हयात आरोग्य सेवा ही तातडीची बाब व देशभरात करोना विषाणुच्या संसर्गामुळे झपाटयाने वाढणारी रुग्णांची संख्या लक्षात घेता वर नमुद केलेल्या ठिकाणी महापालिकेने विलगीकरण कक्ष (Isolation Ward)/ अलगीकरण कक्ष (Quarantine Ward) सुरु केलेले आहे. तथापि या ठिकाणी उपरोक्त नमूद केलेले काम करावयाचे आहे.

या करिता गोन्सालो गार्सिया येथे वॉशिंग मशीन करीता प्लॅटफॉर्म व शेड बांधणे, अधिकारी निवास तामतलाव येथे शेड बांधणे, कौल सिटी येथे आयसोलेशन सेंटरच्या समोरील पोर्चमध्ये शेड बांधणे. इ. नमुद कक्ष ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामांचे सन २०१८-२०१९ या वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुची नुसार कामाचे अंदाजपत्रक बनविणेत आली आहेत. त्यानुसार, यामध्ये विलगीकरण कक्ष (Isolation Ward) व अलगीकरण कक्ष (Quarantine Ward) असलेल्या ठिकाणी नमुद केलेल्या कामाचे रक्कम रु. ६,५८,१७४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

३) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ६,५८,१७४/-

१) दरसुची :- सन २०१८-१९

४) कामाचे स्वरुप :- स्ट्रक्चरल बीम, चॅनल, प्रोफाईल शीट, कॉंक्रिट इ.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- व.वि.श.म.

७) विकास आराखडयातील आरक्षण :-

८) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ०७ अ. क्र. २५४२ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना बाधित तसेच संशयित रुग्णांकरीता नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या विलगीकरण कक्ष (Isolation Ward) व अलगीकरण कक्ष (Quarantine Ward) मध्ये बांधकामाशी संबंधित अनुषंगिक कामे करणेकामी तयार करण्यात आलेल्या रु.६,५८,१७४/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसूचीप्रमाणे तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण-५ संविदा २(२) नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदार मे. सहारा एंटरप्रायजेस यांच्याकडून राज्य दरसूचीतील दराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार (-)**२०.००**% कमी दराने काम करुन घेणेकामी संविदा करुन कार्यादेश देणे व मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ७६२.

विभाग :- आरोग्य
दिनांक :- २३/१०/२०२०

विषय :- **घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी ५० टिपर व १० कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया द्वारे खरेदी करुन मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र हे पालघर जिल्हयातील मोठे शहर असून ४ नगरपालिका, ५३ ग्रामपंचायती असे मिळून दि.०३ जूलै २००९ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या लगतचे शहर म्हणून या शहराची वाढ दिवसेंदिवस होत आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १२,२२,३९० एवढी आहे. सन २०१६ चे 'GIS व Consumer Survey' नुसार वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या १९,०१,२७३ एवढी आहे. सदरील लोकसंख्येत प्रती वर्षी मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ७,०२,२०२ एवढे निवासी, १,२२,०१६ एवढे वाणिज्य मालमत्ता आहेत. तसेच मनपा हद्दीत २२ भाजी मार्केट व २९ मासळी मार्केट आहेत.

तसेच वसई विरार शहरातील रस्ते ९२४ कि.मी. लांबीचे असून कचरा संकलन, रस्ते सफाई इत्यादी कामासाठी वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ९ प्रभाग समिती मध्ये २० झोन तयार करुन २० अभिकर्त्याची नेमणूक केली आहे. तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापना बाबतचे महत्व विचारात घेऊन राष्ट्रीय हरीत न्यायधिकरणात (NGT) दाखल मुळ याचीका क्रमांक १९९/२०१४ मध्ये दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजीच्या आदेशान्वये देशातील राज्यांना व केंद्रशासिक प्रदेशांना घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणी बाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये खालीलप्रमाणे मनुष्यबळ, वाहने उपलब्ध आहेत.

अ.क्र	रस्ते सफाई मनुष्यबळ संख्या	कचरा संकलन मनुष्यबळ संख्या	मनपा मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	मनपा मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे कॉम्पॅक्टर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे टिपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे डंपर संख्या	अभिकर्त्याच्या मालकीचे ट्रॅक्टर संख्या
१	१२५२	१३७४	५५	७०	२	४४	६४	२०

सदरील घनकचरा व्यवस्थापन मार्फत मनपा हद्दीतील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा वरीलप्रमाणे असणारे मनुष्यबळ व वाहने वापरुन प्रती दिवस सरासरी ६५० मेट्रीक टन कचरा क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो. त्यामध्ये प्रामुख्याने ओला कचरा, प्लॅस्टीक कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, घातक टाकाऊ कचरा विलगीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपा क्षेत्रातील प्रत्येक गृह संस्थेकडून व्यवसायिक संस्था, खाजगी संस्था कार्यालये इत्यादी मालमत्ता मधून दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा (विघटनशील पदार्थ जसे अन्न, फळे, पालापाचोळा, भाजीपाला, मांस इत्यादी कचरा) व सुका कचरा (अविघटनशील पदार्थ जसे पुठ्ठा पेपर, रबर काचेच्या वस्तु, लाकूड, नारळाची करवंटी, शहाळी, प्लास्टिक, कापड, धातु जसे लोखंड, स्टिल इत्यादी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घरगुती विघातक कचरा (जसे सॅनिटरी नॅपकीन, डायपर, फुटलेल्या टयुबलाईट, बल्ब, थर्मामिटर कालबाहय, औषध, जंतुनाशक कंटेनर, पेंट कंटेनर, बॅटरी इत्यादी) यांचे संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून घेण्यात येत आहे.

तसेच रेस्टॉरन्ट, हॉटेल लग्न सभागृह उद्यान, भाजी-फळ मंडळ, तब्येलातील शेण, डेअरी येथील ओला व सुका कचरा वेगळा स्वतंत्रपणे संकलन करणे तसेच मनपा हद्दीतील खाजगी कत्तलखाने, मासळी बाजार, मटण दुकान येथील कचरा संकलन करणेकामी तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सुका व ओला कचऱ्याचे विलगीकरण करणेकामी मनपाने २४० लीटर क्षमतेच्या ३७,००० नग HDPE डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत. परंतु शहरात वाढणाऱ्या दैनंदिन घनकचऱ्याच्या प्रमाणात वाढ होत असून मनपाने अतिरिक्त २४० लीटर क्षमतेच्या १५००० नग HDPE डस्टबीन्स खरेदी केल्या असून कचऱ्याचे वर्गीकरण मोठया प्रमाणात होणार आहे.

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या ५५ कॉम्पॅक्टर व ७० टिपर द्वारे शहरातील सर्व कचरा संकलन करणेकामी अपुरे पडत असल्याने नेमलेल्या ठेकेदारांमार्फत डंपर व ट्रॅक्टर द्वारे कचरा उचलावा लागतो. परंतु सदरचे डंपर हे बंदीस्त नसल्याने कचऱ्याची दुर्गंधी येणे, वाऱ्यावर कचरा उडून रस्त्यावर पडणे, अशा तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच सदर वाहनांवर होणारा खर्च देखील जास्त आहे. शिवाय अतिरिक्त मनुष्यबळ लावावे लागतात. त्याकरिता मा.आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार अशा प्रकारचे डंपरचा वापर बंद करुन कॉम्पॅक्टर खरेदी केल्यास काम करण्यास सोयीचे होईल. तरी सदरचे टिपर व कॉम्पॅक्टरचे बाजारभावातील दर मागविले असता प्राप्त दरांची टिपरची

कचरा वाहून नेण्याची क्षमता पडताळणी केली असता मनपाने पुर्वी खरेदी केलेले टिपर हे प्रती फेरी मध्ये ५०० किलो कचरा वाहून नेण्यात येत आहे. तर कॉम्पॅक्टरची ८ टन कचरा वाहून नेण्यात येत आहे. त्यामुळे दैनंदिन होणाऱ्या कामाकरिता वेळ, मनुष्यबळ व खर्च जास्त प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याकरिता बाजारातील नामांकित कंपनीचे टिपर व कॉम्पॅक्टरचे दर मागविण्यात आले आहेत. ते खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वाहनाचे नाव	कंपनीचे नाव	क्षमता	नामांकित कंपनीचे दर
१	टिपर	MAK Envirotech & Solution (India) Pvt.Ltd.	१.५ टन	रु.११,५०,०००/-
२		Pamtec Enviro Systems pvt.Ltd.	१.५ टन	रु.११,३०,०००/-
३		Antony Motors Pvt.Ltd.	१.५ टन	रु.१०,९०,०००/-
१	कॉम्पॅक्टर	MAK Envirotech & Solution (India) Pvt.Ltd.	१२ टन	रु.४३,०४,०००/-
२		Pamtec Enviro Systems pvt.Ltd.	१२ टन	रु.४२,२५,०००/-
३		Antony Motors Pvt.Ltd.	१२ टन	रु.४२,००,०००/-

तरी वरीलप्रमाणे नामांकित कंपनीचे आलेल्या दराप्रमाणे ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टरसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	वाहनांचा प्रकार	प्रति वाहन दर १८% GST व बॉडी बांधनिसह	खरेदी करावयाची वाहनांची संख्या	एकुण खर्च
१	टिपर (१.५ टन क्षमतेचे)	रु.१०,९०,०००/-	५० नग	रु.५,४५,००,०००/-
२	कॉम्पॅक्टर (चेसीस १८५०० GVW व १४ चौ.मि. क्षमतेची बॉडी बांधणी सह)	रु.४२,००,०००/-	१० नग	रु.४,२०,००,०००/-
एकुण खर्च				**रु.९,६५,००,०००/-**

तरी वरीलप्रमाणे असणाऱ्या टिपर व कॉम्पॅक्टर ई-निविदा प्रक्रिया करुन वाहन विभागाकडून खरेदी करुन मिळणे आवश्यक आहे. सदर कामी ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टर खरेदीसाठी **रक्कम रु.९,६५,००,००० (अक्षरी रक्कम रु.नऊ कोटी पासष्ट लक्ष मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत असून सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षातर्गत तरतुद **रक्कम रु.१९ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी ५० नग टिपर व १० नग कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करण्यास व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेकामी ५० टिपर व १० कॉम्पॅक्टर वाहन विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया द्वारे खरेदी करणेकामी रक्कम रु.९,६५,००,००० (अक्षरी रक्कम रु.नऊ कोटी पासष्ट लक्ष मात्र) एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

10/2020.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७६३

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- १९/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कालबाह्य झालेले संगणक, प्रिंटर, व इतर संगणकीय साहीत्य निर्लेखित करुन विल्हेवाट लावणेकामी ई-ऑक्शन प्रक्रिया करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कालबाह्य झालेले संगणकीय साहीत्य निर्लेखित करुन विल्हेवाट लावणेकामी मा. आयुक्त यांच्या मंजूरी अन्वये तसेच मा. सर्वसाधारण सभा दि. ११/०९/२०१९ ठराव क्र. १३ अन्वये सदरचे संगणक, प्रिंटर व इतर संगणकीय साहीत्य खरेदी करणे अथवा नविन संगणक संच भाडयाने घेणेकामी संस्थाकडून स्वारस्याची अभिरुची (Expression of interest) मागविणेकामी जा.क्र.व.वि.शम./मा.तं./१४०/१९-२० दि.११/०२/२०२० तसेच जा.क्र. व.वि.शम./मा.तं./१५९/१९-२० दि. १३/०३/२०२० अन्वये वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतू सदरकामी कोणत्याही संस्थेकडून प्रतिसाद मिळाला नाही. तसेच मा. विशेष सर्वसाधारण सभा ११/०९/२०२० ठराव क्र. १३ अन्वये सदरचे संगणक प्रिंटर, व इतर संगणकीय साहित्य दुरुस्ती होत असल्याचे दुरुस्ती करुन मनपातील जि. प. शाळांना उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश आहेत. परंतू सदरचे साहित्य पुर्णता नादुरुस्त असून हे साहित्य ६ ते ८ वर्षापुर्वीचे असल्याने दुरुस्त करणेकामी आवश्यक स्पेअर पार्ट उपलब्ध होत नाहित. त्यामुळे सदरचे साहित्य निर्लेखित करुन त्याची विल्हेवाट लावणे उचित ठरेल.

वसई विरार शहर महानगरपालिकेने मनपा कार्यक्षेत्रातील तलावांचे लिलाव करणेकामी तसेच विविध विभागातील कालबाह्य साहीत्य निर्लेखित करणेकामी NIC च्या ई-ऑक्शन प्रणालीचा वापर सुरु केला आहे. सदर प्रणालीद्वारे कालबाह्य झालेले संगणक, प्रिंटर व इतर संगणकीय साहीत्य निर्लेखित करुन त्यांचा लिलाव उचित ठरेल. तरी माहिती तंत्रज्ञान विभागाने केलेल्या पाहणीनुसार सद्यस्थितीत नादुरुस्त झालेले १०० संगणक व ५० प्रिंटर हे पुन्हा दुरुस्ती करणे शक्य नाही. तरी सदरचे १०० संगणक व ५० प्रिंटर ई-ऑक्शन प्रक्रियेद्वारे लिलाव करुन निर्लेखित करण्यास मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कालबाह्य झालेले संगणक, प्रिंटर, व इतर संगणकीय साहीत्य जे दुरुस्त करणे शक्य नाही असे संगणक, प्रिंटर, व इतर संगणकीय साहीत्य निर्लेखित करुन विल्हेवाट लावणेकामी ई-ऑक्शन प्रक्रिया करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१९/१०/२०

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७६४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- ३०/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वृंदावन गार्डन नालासोपारा (प.) या ठिकाणी स्थलांतरीत होणा-या प्रभाग समिती (ई) कार्यालयामध्ये तसेच कार्यालयाच्या बाहेर सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील लघुत्तम दर मंजुर करुन L१ दरपत्रकधारका सोबत करारनाम करणेस व कार्यादेश देणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वृंदावन गार्डन नालासोपारा (प.) या ठिकाणी स्थलांतरीत होणा-या प्रभाग समिती (ई) कार्यालयामध्ये तसेच कार्यालयाच्या बाहेर सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामी मा. सहा.आयुक्त (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांच्या मंजुरीनुसार जाहीर दरपत्रक सुचना दि.१४/०८/२०२० पासून ते दि. २०/०८/२०२० रोजी ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (सी), चंदनसार, दुसरा मजला, माहिती तंत्राज्ञान विभागात मागवले असता, सदर कामाबाबत ३ दरपत्रके प्राप्त झाली असून त्यांच्या दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु क्र.	प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा दिनांक	पुरवठादार	एकूण दर (सर्व करांसहीत)
१	**१७/०८/२०२०**	मे. **स्वरा बायो मेट्रिक्स**	रु. **२,०९,६५७/-**
२	१८/०८/२०२०	मे. काला इलेक्ट्रॉनिक्स	रु.२,२९,२६५/-
३	१९/०८/२०२०	मे. के अॅण्ड के इंडस्ट्रिस	रु. २,३९,७४७/-

वरील प्राप्त दरपत्रकांची तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दरांशी तुलना केली असता मे. **स्वरा बायो मेट्रिक्स** यांच्या दरपत्रकातील दर सर्वात कमी व वाजवी असून सदरचे दर मंजूर करुन मंजूर दरानुसार वृंदावन गार्डन नालासोपारा (प.) या ठिकाणी स्थलांतरीत होणा-या प्रभाग समिती (ई) कार्यालयामध्ये तसेच कार्यालयाच्या बाहेर सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे, त्यांच्याशी करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वृंदावन गार्डन नालासोपारा (प.) या ठिकाणी स्थलांतरीत होणा-या प्रभाग समिती (ई) कार्यालयामध्ये तसेच कार्यालयाच्या बाहेर सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामी लघुत्तम निविदाकार मे. **स्वरा बायो मेट्रिक्स** यांचे दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. १६५

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

दिनांक :-३१/१०/२०२०

विषय :- घनकचरा व्यवस्थापना मार्फत मुख्य कार्यालय व प्रभाग समिती कार्यालयाची स्वच्छता तसेच कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी बनविण्यात आलेल्या विलगीकरण कक्षाची स्वच्छता तसेच सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापना मार्फत मनपाचे मुख्य कार्यालय व प्रभाग समिती ए ते आय कार्यालयाची दैनंदिन स्वच्छतेचे काम करण्यात येते. तसेच जगभरात कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाची लागण झालेल्या नागरिकांवर उपचार करणेकामी वसई विरार शहर महानगरपालिकेने नव्याने उभारलेल्या श्री.जिवदानी हॉस्पीटल, चंदनसार तसेच जी.जी.कॉलेज, कौलसिटी, वरुण इंडस्ट्रीज, म्हाडा वसाहत, अग्रवाल या विलगीकरण कक्षाची दैनंदिन स्वच्छता मनपा आस्थापनेवरील कायम सफाई कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येते. तसेच केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सार्वजनिक स्वच्छतेला गुण असल्याने सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे.

अ.क्र	साहित्याचे नाव	प्रमाण	अंदाजीत प्रती साहित्याचा दर	साहित्यावर होणारा अंदाजीत खर्च
१	काळे फिनाईल फर्स्टग्रेड आय.एस.आय.मार्क	९००० ली.	रु.७६/- ली.	रु.६८,४०००/-
२	हायड्रोक्लोरीक ॲसीड ग्रेड-१	९००० ली.	रु.३३/- ली.	रु.२,९७,०००/-
३	दुर्गंधी नाशक फिनेल कॉन्सट्रेट	९००० ली.	रु.७६/- ली.	रु.६,८४,०००/-
४	डांबर गोळया (रंगीत)	१००० कि.	रु.२३०/- कि.	रु.२,३०,०००/-
५	फुलझाडू	२००० नग	रु.७३/- नग	रु.१,४६,०००/-
६	खराटे	१००० नग	रु.५०/- नग	रु.५०,०००/-
७	मॉप	२००० नग	रु.१९०/- नग	रु.३,८०,०००/-
८	वायपर (लादी पुसण्यासठी)	५०० नग	रु.२५०/- नग	रु.१,२५,०००/-

९	रबरी पंम्प (शौचालय)	१०० नग	रु.७५/- नग	रु.७,५००/-
१०	ब्रश (टॉयलेट)	५०० नग	रु.७३/- नग	रु.३६,५००/-
११	युरिनल सेंटेड पॅड	१००० नग	रु.८०/- नग	रु.८०,०००/-
१२	डेटॉल साबण (७५ ग्रॅम)	२००० नग	रु.३५/- नग	रु.७०,०००/-
१३	हॅण्ड वॉश लिक्वीड (७५० मी.ली.)	२००० नग	रु.१२०/- नग	रु.२,४०,०००/-
१४	कापडी डस्टर	५०० नग	रु.३५/- नग	रु.१७,५००/-
१५	ऑफिस डस्टबीन (९ ली.)	५०० नग	रु.१००/- नग	रु.५०,०००/-
१६	सुपडी	१०० नग	रु.४५/- नग	रु.४,५००/-
१७	पायपुसणी	५०० नग	रु.१४०/- नग	रु.७०,०००/-
१८	एअर फ्रेशनर (ओडिनील २०० मी.ली.)	२०० नग	रु.२१०/- नग	रु.४२,०००/-
१९	कापडी मास्क	५०० नग	रु.२२/- नग	रु.११,०००/-
२०	रबरी ग्लोव्हज (९ इंच)	५०० नग	रु.३९/- नग	रु.१९,५००/-
२१	हार्पिक (१ ली.)	१०० नग	रु.१२०/- ली.	रु.१२,०००/-
२२	छोटी बादली (३ लीटर)	२०० नग	रु.७०/- नग	रु.१४,०००/-
२३	मग	२०० नग	रु.३०/- नग	रु.६०००/-
२४	बास्केट	१०० नग	रु.१७०/- नग	रु.१७,०००/-
२५	सॅनिटरी नॅपकीन बॉक्स	५०० नग	रु.१४/- पॅकेट	रु.७०००/-
२६	आरसा	२०० नग	रु.१५०/- नग	रु.३०,०००/-
२७	लाल रंगाच्या पेडल डस्टबीन्स (१० लीटर)	२५० नग	रु.१००/- नग	रु.२५,०००/-
२८	पेपर नॅपकीन	५० नग	रु.५०/- नग	रु.२,५००/-
एकुण				रु.३३,५८,०००/-

तरी वरीलप्रमाणे असणाऱ्या साहित्यासाठी **रक्कम रु.३३,५८,०००/- (अक्षरी रक्कम रु.तेहतीस लक्ष अठ्ठावन्न हजार मात्र)** एवढा अंदाजीत खर्च होणे अपेक्षीत असून सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय **साफसफाई साहित्य खरेदी** या लेखाशिर्षावरील तरतुद **५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी वरीलप्रमाणे साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा कार्यप्रणाली द्वारे सन २०२०-२१ या वर्षाकरिता बी-२ निविदा दर मागवून आवश्यकतेनुसार खरेदी करणेकामी व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

घनकचरा व्यवस्थापना मार्फत मुख्य कार्यालय व प्रभाग समिती कार्यालयाची स्वच्छता तसेच कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण मिळविणेकामी बनविण्यात आलेल्या विलगीकरण कक्षाची स्वच्छता तसेच सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता करणेकामी ई-निविदा कार्यप्रणाली द्वारे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता बी-२ निविदा दर मागवून आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करणेकामी रक्कम **रु.३३,५८,०००/- (अक्षरी रक्कम रु.तेहतीस लक्ष अठ्ठावन्न हजार मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

दर मंजुरी ठराव क्र. - ९६६

विभाग:- बांधकाम
दिनांक :- २०/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती -एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा प्रभाग क्र. ४१ मध्ये हनुमान गल्लीचे मुख्य रस्त्या पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे. (दलित वस्ती सुधारणा योजनाअंतर्गत सन - २०१८-१९) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मुंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ७३,२१,१५२/-
प्रशासकीय मंजुरी	:-	मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३ दि. ०८/०३/२०१९
जिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिकार पात्रधारकान्यता	:-	क्र./न.प्रशासन/प्र.मान्यता/क्र.-१/टे-१/कावि-५८५/२०१९ दिनांक - १९/०९/२०१९
तांत्रिक मंजुरी	:-	मा. शहर अभियंता पु.क्र.बी-१ पृ.क्र. २/१७ सन २०१९-२० दिनांक - ०८/०७/२०१९
ई- टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी	:-	वविशम/बांध/५६९/२०१९-२० दि. १७/०९/२०१९ शहर अभियंता वसई-विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी	:-	दिनांक - १८/०९/२०१९
वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक	:-	दै. लोकमत, दै. वार्ताहार, डी.एन.ए, मिड-डे, दै. जागरुक टाईम्स, प्रात:काल, दै. वित्तबातमी
ई- टेंडरींग द्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख	:-	दिनांक - १४/१०/२०१९
ई- टेंडरींग द्वारे निविदा स्विकारण्याची तारीख	:-	दिनांक - १४/१०/२०१९
विहीत मुदतीत ऑन लाईन प्रक्रीयेद्वारे प्राप्त निविदा	:-	०२
ई- टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दिनांक - ३१/१०/२०१९
सदर कामासाठी ३ निविदा प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णय क्र. सी एस टी २०१७ / प्र क्र. ८ / इमा - २ नुसार तरतुद ४.३ व ४.४ स्पष्टीकरण दि. २९/०१/२०१९		
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	१. कार्यकारी अभियंता २. शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा
१.	मे. हिरेन देशमुख	अंदाजपत्रकीय दराने
२.	मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन	४.९९% जास्त दराने

वरील तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. हिरेन देशमुख** ह्यांची **अंदाजपत्रकीय दराने** निविदा प्राप्त निविदाधारकांमधुन लघुत्तम दराची आहे. सदर निविदेचे **मे. हिरेन देशमुख** यांचे दर तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असुन योग्य व वाजवी आहेत.

तरी **मे. हिरेन देशमुख** यांच्या **अंदाजपत्रकीय दराने** निविदा मुजुरीस दि. ०६ /०५ /२०२० रोजी निविदा समितीने शिफारस करण्यात आलेली आहे.

D:\NEW SI DEP\Anjali Dar mahiti\Thane.docx

तरी मे. हिरेन देशमुख यांच्या अंदाजपत्रकीय दराने निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मान्यता दिलेल्या निविदाधारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सदर कामी मे. हिरेन देशमुख यांची निविदा अंदाजपत्रकीय दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार निम्नतन निविदा दराने (अंदाजपत्रकीय दराने) मान्यता देत आहे. त्यानुसार येणा-या इतर अनुषंगीक खर्चास ही मान्यता देत आहे.

20/10/2020

मा. आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१०/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७६७ विभाग :- बांधकाम

दिनांक :- २१/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग डी मधील वॉर्ड क्र. ६३ येथील रेल्वे स्टेशन लगत असलेल्या दुबे इस्टेट येथील गटारावर एम.एस. चेंबर्स बसविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कायक्षेत्रातील तुळींज, आचोळे, आत्मवल्लभ इ. परिसरातील सांडपाणी/ पावसाळी पाण्याचा निचरा तुळींज मुख्य रस्त्यालगतच्या आर.सी.सी. गटारा मार्गे दुबे इस्टेट नाल्याच्या मार्गाने रेल्वे प्लॅटफॉर्म नं. ४ च्या खालुन जाणाऱ्या नाल्यात होत असतो. दुबे इस्टेट नाल्याची लांबी ८० मी. असुन त्यावर एकुण ७५० X ९०० मी.मी. चे सहा चेंबर आहेत त्यामुळे नाल्याची साफसफाई करणे शक्य होत नाही. करीता सदर नाल्यावर असलेल्या अस्तित्वातील सहा चेंबर व्यतिरिक्त किमान बारा चेंबर व तुळींज फ्लाय ओव्हर लगत असलेला एक चेंबर बनविणे बाबत मा. आयुक्त सो., यांनी सुचना दिल्या आहेत. त्यानुसार सदर कामाचे रक्कम रू. २,७४,९२९/- चे अंदाज पत्रक तयार करणेत आले असून, एकुण १५०० X १२०० मी.मी. चा एक व १५०० X ९०० मी.मी. चे १२ नग चेंबर्सचा समावेश आहे. तरी याकामी मा. आयुक्त प्रशासकीय व वित्तीय प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (डी) आचोळे येथील तुळींज, आचोळे, आत्मवल्लभ इ. परिसरातील गटारावरील एम.एस. चेंबर्स पुरविणे व बसविणे. कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस (रक्कम रु २,७४,९२९/-) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम

६७(३) (क) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेऊन पुढील निविदा प्रक्रिया करणेची कार्यवाही करण्यात यावी.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

1

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. – पालघर,पिन.नं. ४०१ ३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६८

विभाग : क्रिडा विभाग
प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये उसगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उसगांव व शिरवली उदचंन केंद्र, तसेच पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मार्फत वारंवार खंडीत होत असलेला वीज पुरवठा लक्षात घेऊन अखंडीत वीज पुरवड्ा होण्याच्या दृष्टीने महानगपालिकेने सदर तीन्ही ठिकाणी विद्युत जनित्रांची व्यवस्था केली आहे. तसेच पापडखिंड व पेल्हार या पाणी पुरवठा योजनेच्या ठिकाणींही विद्युत जनित्रांची व्यवस्था आहे. सदर जनित्रांसाठी आवश्यक डिझेल मुख्यालय पाणी पुरवठा विभागामार्फत पुरवठा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील पाणी पुरवठा विभागासाठीच्या "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर मुळ तरतूद रु.४० लक्ष इतकी करण्यात आली होती परंतू सदर तरतुद अपुरी पडत असल्याने तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर रु.४० लक्ष तरतूद असून सदर लेखाशिर्षाअंतर्गत माहे एप्रिल २०२० ते माहे ऑगस्ट २०२० पर्यंत इंधन पुरवठा देयके रु. ३६,०३,०००/- इतकी अदा करण्यात आली व रु.३,९७,०००/- इतकी शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षाअंतर्गत माहे सप्टेंबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीकरीता रु.३० लक्ष इतका खर्च येणे अपेक्षित असल्याने अन्य लेखाशिर्षावरून तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावर रु.४०० लक्ष इतकी तरतूद असून आजपर्यंत खर्च निरंक आहे. सदर लेखाशिर्षावर माहे मार्च २०२१ पर्यंत मोठा खर्च अपेक्षित नाही करीता सदर लेखाशिर्षातून रु. ३० लक्ष "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन केल्यास इंधन पुरवठा कामी गैरसोय टाळता येणे शक्य आहे.

तरी वरिल प्रमाणे सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरुन रु.३० लक्ष "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार नमुना नं. १० मध्ये विवरणपत्र सोबत जोडून सादर करण्यात येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वरिल प्रमाणे सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर तरतुद अपुरी पडत असल्याने "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरुन रु.३० लक्ष "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार सादर केलेल्या नमुना नं. १० मधील विवरणपत्रास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ३७६ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- मा. स्थायी समिती सभा प्रशासकीय ठराव क्रं. ५५८ दि १४/२/२०२० मध्ये सुधारणा करणे बाबत.

मुळ ठराव :- महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ७० मीटर अधिक वजा १० % उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन खरेदी करणे कामी प्राप्त निविदामधील कमी दराचे निविदा दराबाबत व निविदाकाराने दिलेले वाटाघाटीचे दर व इतर सेवा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्राप्त दरामध्ये वाटाघाटी करण्यात आल्या असून त्याव्दारे प्राप्त झालेले दर निविदा समितीने मान्य केलेले आहेत. वाहन विदेशातून आयात होणार असल्याने त्याबाबत लागणारी कस्टम डयुटी हि भारतीय रुपयात महापालिकेस भरावी लागणार आहे. तसेच वाहन खरेदी कामी पेमेंट करणेसाठी लेटर ऑफ क्रेडिट (L.C.) काढणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास एक नग ७० मीटर अधिक वजा १० % उंचीचे टर्न टेबल लॅडर वाहन खरेदी करण्यास व कस्टम डयुटी भरण्यास तसेच लेटर ऑफ क्रेडिट (L.C.) उघडून पेमेंट अदा करणेस मा. स्थायी समिती सभा दिनांक १४/०२/२०२० अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच २४ महिने वॉरंटी कालावधी संपल्यानंतर वाहन उत्पादक कंपनीचे भारतातील अधिकृत देखभाल दुरुस्तीकार मे. जोसेफ लेस्ली ॲन्ड कंपनी एल.एल.पी. यांचेकडून वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ३ वर्ष कालावधी करीता साहित्यासह देखभाल दुरुस्ती C.S.M.C. (Comprehensive Service Maintenance Contract) करण्यास व त्याबाबतचे होणारे देयक अदा करणेस व वाहन प्राप्त झालेनंतर वाहनाची विमा पॉलिसी काढण्यास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये कमी दराचे निविदाकार **मे. मॅगिरस जीएमबीएच जर्मनी** यांचेबरोबर संविदा करण्यास मा. स्थायी समिती सभा दिनांक १४/०२/२०२० अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या ई-निविदा मध्ये ७० मीटर अधिक वजा १० % प्रमाणे ६४ मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहन पुरविणे बाबत **मे. मॅगिरस जीएमबीएच जर्मनी** यांनी दर दिलेला आहे.

उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी करण्यास तसेच मे. मॅगिरस जीएमबीएच जर्मनी यांचेकडून ६४ मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहन लिफ्टर सहित खरेदी करण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय तसेच संविदा करण्यांस मंजुरीस्तव सादर.

सुधारीत / पूरक ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत खरेदी करीत असलेल्या ६४ मीटर उंचीची शिडी असलेली टर्न टेबल लॅडर वाहन खरेदी करणे कामाची पुढील प्रक्रिया पुर्ण करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून पुढील कार्यवाही करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६०८

विभाग: सामान्य प्रशासन
दिनांक :२७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यालयीन फर्निचर खरेदी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरपालिकेच्या विविध कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी टेबल, खुर्च्या, कपाटांची मागणी वेळोवेळी भांडार विभागाकडे येते व त्याप्रमाणे आवश्यकता तपासून मागणीची पूर्तता केली जाते. परंतू वाढती लोकसंख्या व कामाचा निपटारा व उपलब्ध असलेली कार्यालयीन जागा याचा विचार करता टेबल, खुर्च्या, कपाटे यांच्या कार्यालयात मोठया प्रमाणावर पसारा होतो व कार्यालय प्रशस्त राहत नाही. याकरिता कमी जागेमध्ये कर्मचारी बसण्यांस तसेच दपत्तर (रेकॉर्ड) ठेवणे यासाठी नविन पध्दतीने लोखंडी फर्निचर केल्यास ते उपयुक्त ठरेल तसेच त्याचा वापर किमान १० ते १५ वर्षे करता येईल या करीता सोबत जोडलेल्या तपशीलाप्रमाणे लोखंडी स्वेअर बार पासून तयार केलेली L शेप टेबल तसेच कॉम्पॅक्टर स्टोरेज सिस्टीम तसेच कपाट इ. फर्निचर खरेदी करणे उचित होईल. तसेच या प्रकारचे फर्निचर प्रभाग समिती (ई) कार्यालयामध्ये उत्पादकाकडून खरेदी केलेले असून ते योग्य व आकर्षक असल्याने सदर तपशिलाप्रमाणे फर्निचरचे दर मागविल्यास आवश्यकते प्रमाणे फर्निचर खरेदी करता येईल.

तसेच वाचनालया करिता लागणारी स्टडी टेबल, पूस्तके ठेवण्याची कपाटे, विद्यार्थाना बसण्यासाठी अभ्यासीके मधील खुर्च्या इ. खरेदीची आवश्यकता आहे.

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील १) सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत फर्निचर / वॉटर कूलर इ. व २) लोकशिक्षण व सामाजिक कार्यक्रम अंतर्गत वाचनालय फर्निचर खरेदी / दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी सोबत जोडलेल्या तपशीलाप्रमाणे लागणारे फर्निचर तयार करुन पूरवठा करणेकामी ई-निविदा मागविण्यात व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ५० लक्ष पर्यंतचे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर फर्निचर व्यवस्था वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यालयीन कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी टेबल, खुर्च्या, कपाट व वाचनालया करिता लागणारी स्टडी टेबल, पूस्तके ठेवण्याची कपाटे, विद्यार्थाना बसण्यासाठी अभ्यासीके मधील खुर्च्या इ. फर्निचर तयार करुन पुरवठा करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार ई-निविदा मागविण्यास येणाऱ्या रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लक्ष) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 28/10/20
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४७८

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कंन्टेन्मेंट झोन करिता लाकडी मूंडे व काथा खरेदी केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगाचे रुग्ण आढळून येत आहेत. माहे मार्च २०२० पासून कोविड-१९ चे पॉझीटीव्ह रुग्ण आढळत असून रुग्ण आढळलेल्या ठिकाणी बॅरेकेटींग बसवून परिसर सिलबंद करावा लागतो व त्यासाठी मोठया प्रमाणात लोखंडी बॅरेकेटींगचे ऐवजी इमारत बांधकाम मध्ये वापरण्यात येणारे लाकडी मूंडे व काथा रस्सी वापर करुन बॅरेकेटींग करण्याबाबत दि. १३/०५/२०२० रोजी मा.आयुक्त साो. यांनी सुचना दिलेल्या आहेत व त्यासाठी लागणारे मुंडे व काथा बंडल रस्सी बंडल खरेदी करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

बाजारामध्ये मूंडे पूरवठादार यांचेकडे चौकशी केली असता त्यांचा दर खालीलप्रमाणे आहे.

८ फूट उंचीचे लाकडी मूंडे	दर १४० प्रती नग + १८ % जी.एस.टी.
१२ फूट उंचीचे लाकडी मूंडे	दर १७० प्रती नग + १८ % जी.एस.टी.
काथा बंडल २०० गुंडया असलेले	दर २००० प्रती बंडल + १८ % जी.एस.टी.

.सदर दराबाबत पुरवठादार मे. हार्ट बीट साऊंड ॲण्ड लाईटस् यांचे सोबत वाटाघाटी करुन खालील मंजूर दराने मूंडे ९ प्रभाग समिती कडे पुरवठा करण्याबाबत मान्य केले आहे. तरी कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव वाढू नये याकरिता पॉझिटीव रुग्ण सापडलेल्या कंन्टेन्मेंट झोन लॉकडाऊन करण्यांस खालीलप्रमाणे ९ प्रभागा करिता दैनंदिन आवश्यकता प्रमाणे काथा व मुंडे खरेदी करण्यात आले असून खालीलप्रमाणे वाटप करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	दिनांक	प्रभाग समिती	तपशिल		
			१२ फूट मुंडे	८ फुट मुंडे	काथा
१.	१०/०७/२०२०	बी	१५०	-	-
२.	११/०७/२०२०	अे	१५०	१००	१
३.	१३/०७/२०२०	ई	७५	५०	१
४.	१४/०७/२०२०	बी	१००	१००	-
५.	१४/०७/२०२०	डी	१००	१००	१
६.	१६/०७/२०२०	डी	१००	५०	-
७.	१८/०७/२०२०	सी	७५	५०	-
८.	२२/०७/२०२०	डी	५०	५०	-
९.	२४/०७/२०२०	वरुण इंड्रस्ट्रीस	४०	४०	१
१०.	२५/०७/२०२०	एच	५०	५०	१
११.	२८/०७/२०२०	जी.जी. कॉलेज कंपाऊंड वॉल तयार करण्यास	४०	४०	-

१२.	३०/०७/२०२०	अे	७५	५०	२
१३.	३१/०७/२०२०	एफ	-	-	३
१४.	३१/०७/२०२०	जी	५०	५०	१
			१०५५	७३०	११

अ.क.	तपशिल	आवश्यक नग	दर	१८ % जी.एस.टी.	एकूण
१.	१२ फूट उंचीचे लाकडी मूंडे	१०५५ नग	१६० प्रति नग	३०३८४	१९९१८४
२.	८ फूट उंचीचे लाकडी मूंडे	७३० नग	१२५ प्रति नग	१६४२५	१०७६७५
३.	काथा बंडल २०० गुंडया असलेले	११ बंडल	१८०० प्रति बंडल	३५६४	२३३६४
				एकूण	३,३०,२२३/-

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय विभागातील रुग्णालय व शहराअंतर्गत विविध ठिकाणी दवाखाने व्यवस्थापन अंतर्गत रुग्णालय इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरिता लाकडी मूंडा व काथा खरेदी करण्यांस महापालिकेकडे वार्षिक दर मंजूर नाहीत. बॅरेकेटींगचे काम महत्वाचे व तात्काळ करावयाचे असल्याने ई-निविदा व दरपत्रक मागविणे यामध्ये बराच वेळ जाईल. तरी पॉझिटीव रुग्ण आढळलेल्या कन्टेन्मेंट भागामध्ये बॅरेकेटींग फिटींग करणे अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ पूरवठादार मे. हार्ट बीट साऊंड ॲण्ड लाईटस् यांचेकडून थेट खरेदी करण्यात आले असून त्यासाठी आलेल्या रक्कम रु. ३,३०,२२३/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद लाकडी मुंडे व काथा तात्काळ विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कंन्टेन्मेंट झोन करिता लाकडी मुंडे व काथा खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ३,३०,२२३/- (अक्षरी रुपये तीन लक्ष तीस हजार दोनशे तेविस मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३७९

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयातील दुरध्वनी यंत्रणा देखभाल करणे व आवश्यक साहीत्य पुरविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील पदाधिकारी, अधिकारी यांच्या दालनात व विभागातील कर्मचारी यांना कार्यालयीन कामासाठी व आलेले दुरध्वनी स्विकारण्यासाठी सन २०१७-१८ पासून सामान्य प्रशासन विभागाकडुन दूरध्वनी यंत्रणा बसविण्यात आली आहे. सदरचे दूरध्वनी नियंत्रित करण्यासाठी मुख्यालयातील पहिला मजला येथे ९६ इंटरकॉम व १६ टेलिफोन इ.पी.ऐ.बी.एक्स लाईनचे मशिन बसविण्यात आले आहे.

सदर दूरध्वनी यंत्रणा सन २०१७-१८ पासून कार्यान्वित असून सदर यंत्रणेची देखभाल दूरुस्ती करणे गरजेचे आहे. मा. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाने सर्वे केला असता सदर यंत्रणा ही चालू स्थितीत असल्याचे निदर्शनास आले. परंतू काही दूरध्वनीची केबल खराब होऊन मुख्यालयात पहिल्या मजल्यावर असलेल्या इ.पी.ऐ.बी.एक्स मशिन सोबत असलेले जंक्शन बॉक्स बदलून दूरध्वनी यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी सदर दूरध्वनी यंत्रणे अंतर्गत वायरिंग नादुरुस्त होणे इ.पी.ऐ.बी.एक्स मशिन मध्ये तांत्रिक दोष होणे या कारणामुळे मशिनची देखभाल दूरुस्ती वेळोवेळी करणे गरजेचे आहे. सदर कामी नमूद दूरुस्तीचा तपशिल खालीलप्रमाणे.

अनु क्र.	साहित्य	दर	प्रमाण	एकूण
१	२ Pair Wire Box	३०००/-	१	३,५४०/-
२	Junction Box	३६००/-	१	४,२४८/-
३	Non comprehensive AMC	३२०००/-	१	३७,७६०/-
	एकूण			४५,५४८/-

तरी मुख्यालयातील दूरध्वनी यंत्रणा देखभाल दूरुस्ती करणे व आवश्यक वायरिंग सहित साहित्य फिटींगसह पुरविणेकामी एका वर्षासाठी रक्कम रु.४५,५४८/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१, 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल. तरी उपरोक्त कामासाठी दरपत्रक मागवुन दुरध्वनी यंत्रणा देखभाल करणे व आवश्यक साहीत्य पुरविणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयातील दुरध्वनी यंत्रणा देखभाल करणे व आवश्यक साहीत्य खरेदी करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८०

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २७/१०/-२०-२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मालमत्तांचे क्षेत्रफळ मोजणी करणे कामी GPS आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र व Laserआधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे मनपा हद्दीतील विविध आस्थापनांवर मालमत्ता कर आकारणी केली जाते. आस्थापनांच्या क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराची रक्कम आकारली जाते. नोंदणीकृत मालमत्तांचे तसेच नवीन मालमत्तांचे क्षेत्रफळ मोजताना तंतोतंत व जलदरित्या मोजणेकामी GPS आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र व Laserआधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्राची आवश्यकता आहे.

सदर डिव्हाईस वापरल्याने मालमत्तांचे क्षेत्रफळ तंतोतंत व जलदगतीने मोजणे शक्य होणार आहे. तसेच याद्वारे क्षेत्रफळ तंतोतंत मोजल्याने मालमत्ता कराचे होणारे नुकसान टाळणे शक्य होणार आहे.

तरी याकामी प्रायोगिक तत्त्वावर ४ नग GPS आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र खरेदी करणेकामी अंदाजित रक्कम रु. (४* १७,७९९/-) + १८% GST =रु. ८४,०११.२८/- व १३ नग Laserआधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र खरेदी करणेकामी अंदाजित रक्कम रु. (१३* ४०९०/-) + १८% GST = रु. ६२,७४०.६०/- असे एकुण १,४६,७५२/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१ संगणक साहीत्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी ४ नग GPS आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र व ४ नग Laser आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र खरेदी करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मालमत्तांचे क्षेत्रफळ मोजणी करणे कामी GPS आधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र व Laserआधारीत क्षेत्रफळ मोजणी यंत्र खरेदी करुन बसविणे कामी दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणक साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३८६

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २७/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी लागणारे साहित्य व इतर अनुषंगीक साहीत्य खरेदी करणेकामी वाटाघाटी अंती दर मंजूर करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी लागणारे साहित्य व इतर अनुषंगीक साहीत्य खरेदी करणेकामी मा.आयुक्त यांच्या दि. २०/०८/२०२० रोजीच्या मंजूर टिपणी अन्वये दि. ०४/०९/२०२० ते दि.११/०९/२०२० या कालावधीत ई-निविदा सादर करण्यात आली होती. परंतु सदर निविदेसाठी एकाही निविदाकाराने निविदा भरली नसून निवदा स्पर्धात्मक होण्यासाठी किमान तीन निविदाकारांची आवश्यकता असते. त्याअनुषंगाने सदर निविदेस दि. १५/०९/२०२० रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. प्रथम मुदतवाढीनंतरही एकाही निविदाकारानी निविदा भरली नसल्याने दि. २१/०९/२०२० रोजी पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली. द्वितीय मुदतवाढ देऊनही सदर निविदेसाठी एकच निविदाकार प्राप्त झाल्याने दिनांक २४/०९/२०२० ते दिनांक ३०/०९/२०२० रोजी पर्यत फेर निविदा सादर करण्यात आली होती. ई-निविदा सादर केली असता सदर निविदेत एका निविदाकाराने सहभाग घेतला. दि. ०६/१०/२०२० रोजीच्या मा. उपायुक्त यांच्या मंजुर टिपणी अन्वये लखोटा क्र. १ उघडण्यात आले असता सदर निविदेत सहभाग घेतलेल्या १ निविदाकारानी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असुन मा. निविदा समितीच्या दि. 92/90/२०२० रोजीच्या मंजुरी अन्वये पात्र निविदाधारकाचे क्रं. २ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. १२/१०/२०२० रोजी उघडण्यात आले. त्यानुसार प्राप्त दरांमध्ये वाटाघाटी करणे कामी मे. काईट इंडीया यांना जा. क्र. ववविशम/मा.तं/६३/२०-२१ दि. १२/१०/२०२० रोजी पत्र देण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर दरांमध्ये वाटाघाटी करण्यात आली असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	साहीत्य	Qty	काईट इंडिया		वाटाघाटीअंती दर एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	
			प्रति नग रक्कम सर्व करांसहीत	एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	प्रती नग रक्कम	एकुण रक्कम
1	Motherboard G41	20	2,800/-	56,000/-	2,800/-	56,000/-
2	Motherboard H61	5	3,600/-	18,000/-	3,600/-	18,000/-
3	Motherboard H81	5	3,800/-	19,000/-	3,750/-	18,750/-
4	Motherboard H110	25	5,000/-	1,25,000/-	5,000/-	1,25,000/-
5	Processor Core 2 Duo	15	900/-	13,500/-	850/-	12,750/-
6	Processor Fan	15	500/-	7,500/-	500/-	7,500/-
7	RAM DDR2 (2 GB)	10	950/-	9,500/-	950/-	9,500/-
8	RAM DDR3 (2 GB)	15	1050/-	15,750/-	1,020/-	15,300/-
9	RAM DDR3 (4 GB)	10	1,499.90/-	14,999/-	1,499/-	14,990/-
10	RAM DDR4 (4 GB)	15	1,499.90/-	22,498.50/-	1,480/-	22,200/-

11	SMPS	25	920/-	23,000/-	920/-	23,000/-
12	HDD 500 GB	5	2,600/-	13,000/-	2,200/-	11,000/-
13	CMOS BATTERY	20	30/-	600/-	30/-	600/-
14	Cabinet	5	1,800/-	9,000/-	1,800/-	9,000/-
		Total		3,47,347.50/-		3,43,590/-

तक्ता क्र. २ (प्रिंटर स्पेअर पार्ट)

अनु. क्र.	साहीत्य	Qty	काईट इंडिया		वाटाघाटीअंती दर एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	
			प्रति नग रक्कम सर्व करांसहीत	एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	प्रती नग रक्कम	एकुण रक्कम
1	HP Fuser Teflon Sleeve	35	1,000/-	35,000/-	850/-	29,750/-
2	Hp Fuser Pressure Roller	30	1,500/-	45,000/-	1,450/-	43,500/-
3	Hp Page Pickup Roller & servicing	30	800/-	24,000/-	800/-	24,000/-
4	Hp Logic Board/Formatter Card	10	3,500/-	35,000/-	3,500/-	35,000/-
5	Ricoh Page Pickup Roller & servicing	15	900/-	13,500/-	790/-	11,850/-
		Total		1,52,500/-		1,44,100/-

तक्ता क्र. ३ (इतर संगणकीय साहित्य)

अनु. क्र.	साहीत्य	Qty	काईट इंडिया		वाटाघाटीअंती दर एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	
			प्रति नग रक्कम सर्व करांसहीत	एकुण रक्कम (सर्व करांसहीत)	प्रती नग रक्कम	एकुण रक्कम
1	CAT 6 Cable 305 mtr	1	5,500/-	5,500/-	5,500/-	5,500/-
2	Wired Keyboard	50	350/-	17,500/-	350/-	17,500/-
3	Wired Mouse	50	300/-	15,000/-	300/-	15,000/-
4	RJ45 Pin (100 per Box)	2	600/-	1,200/-	600/-	1,200/-
5	Wifi Adapter (300mbps)	5	500/-	2,500/-	500/-	2,500/-
6	Wifi Router (300mbps)	5	1,250/-	6,250/-	1,200/-	6,000/-
7	4 Port Switch	5	600/-	3,000/-	600/-	3,000/-
8	8 Port Switch	5	700/-	3,500/-	700/-	3,500/-
9	Crimping Tool	1	600/-	600/-	600/-	600/-
10	Pen drive 32 GB	20	500/-	10,000/-	500/-	10,000/-
11	UPS 600 VA	10	1,950/-	19,500/-	1,950/-	19,500/-
12	Acer laptop charger	1	1,800/-	1,800/-	1,800/-	1,800/-
13	SPIKE GUARD	5	430/-	2,150/-	43/-	2,150/-
14	1 TB PORTABLE HDD	2	3800/-	7,600/-	3800/-	7,600/-
		Total		96,100/-		95,850/-

वरील प्राप्त वाटाघाटी अंती दरांची बाजारभावाशी तुलना केली असता मे. काईट इंडीया या कंपनीचे वाटाघाटी अंती दर तुलनात्मकरित्या कमी व वाजवी आहे. सदर वाटाघाटी अंती दर दि. २१/१०/२०२० रोजी मा.निविदा समिती सभेत ठेवण्यात आले होते. त्याअनुषंगाने वाटाघाटी अंती दर मंजूर करुन मे. काईट इंडीया या निविदाकाराशी संविदा करणेस मा.निविदा समितीची शिफारस असुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील संगणक व प्रिंटर दुरुस्त करणे कामी लागणारे साहित्य व इतर अनुषंगीक साहीत्य खरेदी करणेकामी लघुत्तम निविदाकार मे. काईट इंडीया यांचे वाटाघाटी अंती दर मंजूर करुन, संविदा करणेस व कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) २३/१०/२०२०.
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८२

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक २८/४०/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोवीड-१९ टेस्ट करणे कामी स्वतंत्र RT-PCR लॅबमध्ये लागणारी प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच या व्यतिरिक्त कोवीड-१९ चे प्रादुर्भाव रोखण्याकरीता महापालिका कार्यक्षेत्रात अलगीकरण कक्ष, विलगीकरण कक्ष, कोवीड हेल्थ सेंटर, समर्पित कोवीड हेल्थ सेंटर व अधिग्रहीत केलेले रुग्णालय नव्याने सुरु करण्यात आलेले असून कोवीड-१९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर चाचणीची क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील कोवीड -१९ संशयित रुग्णांचे स्वॉब नमुना चाचणी करीता जे.जे रुग्णालय, हायकिन बायोफार्मास्युटिकल्स, मुबई येथे नियमितपणे पाठवावे लागतात. परंतू त्याठिकाणी कामाचा ताण अधिक असल्याकारणाने कोवीड संशयित रुग्णांचे चाचणी अहवाल विलंबाने प्राप्त होतात. सबब वैद्यकीय सेवा देणेकामी गैरसोय होत असल्यामुळे श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे RT-PCR लॅब सुरु करण्यात आलेली आहे.

डॉ.सुनिल जयकर, मायक्रोबायोलॉजिस्ट यांचेकडील प्राप्त अहवाल अवलोकनी घेता कोविड-१९ संशयित रुग्णांची चाचणी करणेकामी खालील यादीतील प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करणे आवश्यक असून त्याकामी अंदाजे रक्कम रु.५३,९००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	नाव	उत्पादीत कंपनीचे नाव कॅट नं	पॅकिंग	मागणी
1	1000UL Universal Racked Filter Tip,Sterile Specifications :- Sterillized Aerso Tips in Racked Format	Genaxy – GEN-FB-1000-R-S	6 Racks	4
2	200 UL Universal Graduacation Racked Filter Tip Sterile	Genaxy – GEN-FB-200-R-S	10 Racks x 96	4
3	10UL Universal Graduation /Rac Filer Tip, Sterile	Genaxy – GEN-FB-10-R-S	10 Racks x 96	4
4	Ethanol	China- NA	500 ml	20

तरी उपरोक्त प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी येणारा खर्च सन २०२०-२१ या वर्षाकरीता "रुग्णालयासाठी यंत्रे व इतर साधने" या भांडवली खर्चातील लेखाशिर्षाखाली तरतुदीमध्ये शिल्लक रक्कम रु.३७,२४,७०६/- मधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरचे साहित्य खरेदी करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- सदरचे साहित्य RT-PCR लॅबकरीता आवश्यक असून उपरोक्त प्रस्तावामधील प्रयोगशाळा रसायने व तद्अनुषंगिक साहित्य मे.साय-फाय बायोलॉजिकल्स, पूणे यांच्याकडून विनानिविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.५३,९००/- (अक्षरी- रूपये त्रेपन्न हजार नऊशे मात्र) खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८३ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-२८/३०/२०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात बोअरवेल देखभाल - दुरूस्ती कामी आवश्यक साहित्य अवजारे खरेदी करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजित रक्कम :- रू. ५०,००,०००/- (सन २०२०-२१ व सन २०२१-२२)

वर्षे	रक्कम रु.
सन २०२०-२०२१	रु. २० लक्ष
सन २०२१-२०२२	रु. ३० लक्ष

कामाची आवश्यकता :- वसई - विरार शहर महानगरपालिकाक्षेत्रातील बोअरवेल - देखभाल दुरुस्तीची कामे खात्यामार्फत करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. ०१/०९/२०२० च्या टिप्पणीस मान्यता दिली असुन त्यानुसार सद्य:स्थितीत एक पथक स्थापन करुन त्यासाठी एक वाहन व दरपत्रकाव्दारे रु. ३ लक्ष पर्यंत आवश्यक साहित्य मागवुन काम सुरु करण्यांत आले आहे.

महापालिका क्षेत्रात सुमारे १३७२ इतक्या बोअरवेल असुन नागरीक सदर बोअरींगच्या पाण्याच्या वापर करीत आहेत. ज्याभागात महापालिकेच्या जलवाहिन्यां अंथरल्या नाही अशा ग्रामीण भागातील नागरीक बोअरवेल / विहिरींच्या पाण्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे सततच्या वापराने बोअरवेल मध्ये बिघाड होत असून खात्यामार्फत सदर बोअरवेल दुरुस्ती करावयाच्या असल्याने पाणी पुरवठाविभागाकडे या कामी आवश्यक साहित्य उपलब्ध असणे गरजचे आहे. आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी कामी बी/२ प्रकारची निविदा मंजूर असणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

सदर कामी सन २०२०-२०२१ व सन २०२१-२२ करीता ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक असून सन २०२०-२१ मध्ये रु. २० लक्ष व सन २०२१-२२ करिता रु.३० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा प्रस्तावित "**बोअरवेल दुरुस्ती व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी** " या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- सन २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात बोअरवेल देखभाल - दुरुस्ती कामी आवश्यक साहित्य अवजारे खरेदी करणे कामी रक्कम रु. ५० लक्ष खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी तसेच सदर कामी बी/२ प्रकारची ई-निविदा मागविण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो, यांची मंजूरी असे.

28.01.2020.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८४

विभाग: भांडार विभाग
दिनांक :२८/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- कोरोना (कोविड-१९) करिता प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येत की, संपुर्ण देशभरात कोविड-१९ ची साथ पसरली असून राज्यात तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात कोरोनाचे रुग्ण आढळत असून कोविड-१९ प्रतिबधात्मक उपाय योजना करण्यासाठी मनपा तर्फे विविध उपाय योजनार करण्यात येत होत्या व केल्या जात आहेत. देशात दि.२२/०३/२०२० पासून लॉकडाऊन असल्या कारणाने आवश्यक साधन-सामुग्री खरेदी करण्यासाठी बऱ्याच अडचणी येत होत्या. कोविड-१९ ची साथ पसरल्याने कार्यालयीन सभा घेण्यास मनाई असल्याने बैठका जरी आयोजित झाल्या नसल्या तरी आपत्कालीन स्थितीमध्ये कोविड-१९ प्रतिबंधक उपाय योजना करण्यास आवश्यक लागणारी साहित्य / साधन सामुग्री महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार उपरोक्त खरेदीस प्रशासकीय व वित्तीय कार्योत्तर मंजूरी चे अधिनराहून साहित्य खरेदीचे आदेश दिले गेले होते व पुढील मंजुरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५(२)(२) अन्वये थेट खरेदी करुन संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा. आयुक्त ह्यांचे मंजुरी अन्वये विविध प्रस्तावात नमुद करण्यात आले होते.

महानगगरपालिकेचे निवडून आलेला सदस्यांचा कालावधी दि.२८/०/२०२० रोजी संपलेल असून नव्याने निवडणूक होऊन समित्यांच्या नेमणूका होण्यास बराच अवधी जाणार आहे. परंतु सध्या मा. आयुक्त यांना महापालिकेचे प्रशासक म्हणून नेमलेले आहे ते मनपाचे सक्षम प्राधिकारी आहेत. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी दि. १४/०४/२०२० ते दि. २६/०६/२०२० या कालावधीत खरेदी केलेल्या साहित्याचे झालेला खर्चास मंजुरी घेणे उचित होईल. दि. १४/०४/२०२० ते दि. २६/०६/२०२० या कालावधीत कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्र.	साहित्य खरेदीचा तपशिल	पुरवठा दाराचे नाव	झालेला खर्चाची रक्कम
१.	कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांना पिण्याचे पाणी करिता १ लीटर बाटली बंद पाणी पुरवठा करणे	के.के. डीस्ट्रीब्युटर	१,००,२००/-
२.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ रुग्णांकरिता बिस्कीट पुरविणे	झरना ट्रेडर्स	३२,६८८/-
३.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ हॅण्डबील व स्टीकर छपाई करणे	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	१,९२,३४०/-
४.	कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांना व संशयित रुग्णांना आर.ओ. वॉटर २० ली. जार पुरविणे	सेवालाल इंटरप्रायझेस	७८,०००/-
५.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ रुग्णांकरिता बिस्कीट पुरविणे	झरना ट्रेडर्स	३२,६८८/-
६.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ हॅण्डबील छपाई करणे	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	४,८७,३४०/-
७.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ हॅण्डबील छपाई करणे	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	५,३१,०००/-
८.	कोविड-१९ पॉझिटीव्ह रुग्णांकरिता मीच माझा रक्षक पुस्तिका छपाई करणे	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	१,१८,०००/-
९.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	१,०६,२००/-

	A/४ साईज मध्ये स्टीकर छपाई करणे		
१०.	लोकशिक्षण व प्रसिद्धी करिता कोविड-१९ बॅनर छपाई करणे	पुजा ग्राफिक्स	९,२८,१४३/-
११.	मनापा हद्दीमध्ये कंन्टेन्मेंट झोन करिता लाकडी मुंडे व काथा खरेदी करणे	हार्टबीट सांऊड अॅ. लाईटस्	३,२१,७८६
१२.	कोविड-१९ पॉझिटीव्ह रुग्णांकरिता मागदर्शक पुस्तिका छपाई करणे	मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस	३५,४००/-
१३.	कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांकरिता गादया खरेदी करणे	द फर्निचर स्टोअर	१२,०७,१४०/-
१४.	कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांना पिण्याकरिता आर.ओ. वॉटर २० ली. जार पुरविणे	सेवालाल इंटरप्रायझेस	७५,०००/-
१५.	कोविड-१९ उपचार केंद्रावर साहित्य खरेदी	मे. नटराज मार्केटींग	२,४८,४१०/-
१६.	कोविड-१९ उपचार केंद्रावर चादर, बेडशीट पुरविणे	जैन हॅन्डलूम मार्ट	१,३२,८५०/-
१७.	कोविड-१९ उपचार केंद्रावर दैनदिंन स्वच्छतेकरिता रुटस स्क्रब मशिन खरेदी करणे	रुटस् स्क्रब मल्टीक्लीन लि.	५,१२,७१०/-
१८.	कोविड-१९ उपचार केद्रांवर कंटेनर व नाश्ताचे फॉईल पेपर पुरविणे	मे. अरिहंत ट्रेडर्स	१४,१३,०००/-
१९.	कोविड-१९ उपचार केंद्रावर दैनदिंन स्वच्छतेकरिता इलेक्ट्रीकल मॅन्युअल स्विपिंग मशिन खरेदी करणे	हाको इंडस्ट्रीज प्रा.लि.	४५,६०० /-
२०.	कोविड-१९ उपचार केंद्रावर बेडशीट, चादर धुण्यासाठी कमर्शिअल वॉशिंग मशिन खरेदी करणे	मे. मार्काटेक्स	६,५२,२००/-
२१.	कोविड -१९ उपचार केंदावर रुग्णांना आर.ओ. वॉटर २० ली. जार पुरविणे	मे. सेवालाल इंटरप्रायझेस	१,००,०००/-
२२.	कोविड-१९ उपचार केंद्रावर झोपण्यासाठी उशी पुरविणे	दी फर्निचर स्टोअर	२८,३२०/-
२३.	कोविड- १९ उपचार केंद्रावर जी.जी . कॉलेज हेल्थ सेंटर वर डिस्चार्ज कार्ड छपाई करणे	मे. अनिरुध्दाय इंम्प्रेशन	२१,२४०/-
		एकुण	७४,००,२५५/-

वरिल प्रमाणे विना निविदा झालेल्या दि. १४/०४/२०२० ते दि. २६/०६/२०२० या कालावधी मध्ये अत्यावश्यक सेवेसाठी झालेल्या रक्कम रु. ७४,००,२५५/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव:- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद आवश्यक साहित्य तात्काळ पुरवठादार हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता उपचार केंद्रावर आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ७४,००,२५५५/- (अक्षरी चौऱ्याहत्तर लक्ष दोनशे पचावन्न मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९८५ विभाग : बांधकाम

दिनांक : २८/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ODF ++ साठी प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ODF ++ साठी प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करण्यासाठी मा. अति.आयुक्त ह्यांनी दि. ०७/१०/२०२० रोजी व मा. कार्यकारी तथा शहर अभियंता ह्यांनी दि. ०८/१०/२०२० मिंटीग घेतली होती. त्या अनुषंगाने ODF++ साठी प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I कडून स्वच्छता गृहाची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रके मागविण्यात आली आहेत.

खालील तपशीलामध्ये एकूण अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करण्यात आली आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	Units	सिटची संख्या	अंदाजपत्रकीय रक्कम
१	A	१७	११४	रु. २३,३४,८८४/-
२	B	०९	३९	रु. १५,५१,३१५/-
३	C	२९	१६६	रु. ७१,७७,०७५/-
४	D	१५	६२	रु. १५,२८,९४२/-
५	E	१४	७१	रु. ३१,०१,५६६/-
६	F	१५	५६	रु. २०,३९,६७०/-
७	G	२०	१३९	रु.९,६४,०३८/-
८	H	१४	११०	रु. ४३,०५,०३५/-
९	I	२०	१०५	रु. १५,१२,६४२/-
एकुण		१५३	८६२	
एकुण अंदाजपत्रकीय रक्कम				रु. २,४५,१५,१६७/-

तरी वरील प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ODF++ साठी प्रभाग समिती 'A' TO 'I' मधील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करण्यासाठी रु. २,४५,१५,१६७/- या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

ठराव:-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ODF ++ साठी प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करणे कामी होणाऱ्या एकूण रक्कम रु. २,४५,१५,१६७/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

28/10.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८६

विभाग: भांडार विभाग
दिनांक २८/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील चालू करण्यात आलेले कोविड-१९ हेल्थ सेंटरसाठी खरेदी केलेल्या साहित्य खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये कोविड-१९ चे रुग्णांवर उपचार करण्यांस आयसोलेशन केंद्रावर साहित्याची आवश्यकता होती. तसेच फिवर क्लिनीक साठी बॅनरची आवश्यकता होती. या मागणीसाठी लॉकडाऊन असल्याने मंजूर ई-निविदा नसल्याने खुल्या बाजारारमधून विना ई-निविदा तात्काळ खालील आवश्यक बाबी विविध पूरवठादाराकडून दि. ०१/०५/२०२० ते दि. २०/०८/२०२० या कालाधीत खरेदी केल्या. त्याबाबत त्यांचे खालील प्रमाणे बीले प्रलंबित असून ती अदा करावयाची आहेत.

अ क्र	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले - नग	मुळ किंमत	जी. एस.टी	एकुण रक्कम
१.	श्री समर्थ कृपा	३" x ४" फुट	फिवर क्लिनिक साठी	०१/०५/२०२०	१००	१०	-	१२०००
२.	श्री समर्थ कृपा	५" x ४" फुट	फिवर क्लिनिक साठी	०१/०५/२०२०	८	२०	-	३२००
३.	श्री समर्थ कृपा	५" x ४" फुट	फिवर क्लिनिक साठी	०१/०५/२०२०	२२	१०	-	४४००
४.	श्री पद्मावती प्लास्टीक	२७ x ३० इंच ब्ल्यू कॅरी बॅग	आयसोलेशन कंद्रावर नाश्ता व जेवण नेण्यासाठी	०८/०६/२०२०	१६	१००	१८%	३३९८
५.	श्री जिवदानी ॲडव्हरटायझिंग	१८" x ६" फ्रेम	कोविड संदर्भातील नागरीकांना सूचना देण्यासाठी विनायिल स्टिकर	२२/०६/२०२०	२००	६०	१८%	१४१६०
६.	श्री जिवदानी ॲडव्हरटायझिंग	१" x १.५" फ्रेम	कोविड संदर्भातील नागरीकांना सूचना देण्यासाठी विनायिल स्टिकर	२२/०६/२०२०	९००	८०	१८%	८४९६०
७.	जलाराम प्लास्टीक	इको ग्रीन गारबेज बॅग	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन	२२/०६/२०२०	४० kg	१४०	-	५६००

अ क्र	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले - नग	मुळ किंमत	जी. एस.टी	एकुण रक्कम
			केंद्र					
८.	सातेरी बद्रक्ली डिस्ट्रीब्युटर	जार उचलण्यासाठी हॅडल	म्हाडा इमारत क्रं. १० व १४ (आयसोलेशन केंद्र)	२६/०६/२०२०	४	१००	-	४००
९.	सातेरी बद्रक्ली डिस्ट्रीब्युटर	२० लिटर जार साठी बुच (सिल बंद करण्यासाठी)	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र व म्हाडा इमारत क्रं. १० व १४ (आयसोलेशन केंद्र)	२६/०६/२०२०	२५००		-	३७५०
१०.	जलाराम प्लास्टीक	इको ग्रीन गारबेज बॅग	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	२९/०६/२०२०	५१ kg	१४०	-	७१४०
११.	जलाराम प्लास्टीक	इको ग्रीन गारबेज बॅग	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	०८/०७/२०२०	३० kg	१४०	-	४२००
१२.	जलाराम प्लास्टीक	ॲसिड, वायफर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१३/०७/२०२०	-	-	-	३००५
१३.	जलाराम प्लास्टीक	इको ग्रीन गारबेज बॅग	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१५/०७/२०२०	३० kg	१४०	-	४२००
१४.	श्री नटराज मार्केटींग	लादी पुसायचा रॉड सहीत वायपर	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७/२०२०	५०	८०.५१	१८%	४७५०
१५.	श्री नटराज मार्केटींग	ब्रोम झाडू	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७/२०२०	५०	८५.००	-	४२५०
१६.	श्री नटराज मार्केटींग	टॉयलेट क्लिनिंग	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७/२०२०	२५	५०.८५	१८%	१५००
१७	श्री नटराज मार्केटींग	ब्रोम वुड कोको	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन	१५/०७/२०२०	२५	४०	-	१०००

अ क्र.	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण केंद्र	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले - नग	मुळ किंमत	जी. एस.टी	एकुण रक्कम
१८.	श्री नटराज मार्केटींग	लादी पुसायचे डस्टर	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	१००	८.९२	१२%	९९९
१९.	श्री नटराज मार्केटींग	प्लास्टीक डोरमॅट	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	२००	५०	१८%	११८००
२०.	श्री नटराज मार्केटींग	१० लिटर जार मधील पाणी ठेवायचे भांडे	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	५०	११०.१७	१८%	६५००
२१.	श्री नटराज मार्केटींग	२० लिटर रिकामे जार	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	५०	११८.६५	१८%	७०००
२२.	श्री नटराज मार्केटींग	प्लास्टीक डोरमॅट	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	१२३ चौ.फुट	५०	१८%	७२५७
२३.	श्री नटराज मार्केटींग	फ्लोर मॉप	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	२५	१४८.३१	१८%	४३७५
२४.	श्री नटराज मार्केटींग	डस्टपॅन (सुपडी)	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१५/०७ /२०२०	५०	१३.५६	१८%	८००
२५.	श्री नटराज मार्केटींग	फ्लोर मॉप	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१०	१४८.३१	-	१४८३
२६.	श्री नटराज मार्केटींग	लादी पुसायचा रॉड सहीत वायपर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१०	८०.५१	-	८०५.१०
२७.	श्री नटराज मार्केटींग	ब्रोम झाडू	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१०	८५	-	८५०
२८.	श्री नटराज मार्केटींग	टॉयलेट क्लिनिंग ब्रश	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	५	५०.८५	-	२५४.२५
२९.	श्री नटराज मार्केटींग	डस्टपॅन (सुपडी)	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	५	१६.९५	-	८४.७५
३	श्री नटराज	ड्रम ६० लिटर	जी.जी. कॉलेज	१७/०७	१२	५८०	-	६९६०

अ क्र	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले - नग	मुळ किंमत	जी. एस.टी	एकुण रक्कम
०.	मार्केटींग	(कचरा साठवण्यासाठी)	कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	/२०२०				
३१.	श्री नटराज मार्केटींग	बकेट १९ लिटर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	३६	१५०	-	५४००
३२.	श्री नटराज मार्केटींग	मग १ लिटर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१७	१८०	-	३०६०
३३.	श्री नटराज मार्केटींग	बकेट ५ लिटर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१००	६०	-	६०००
३४.	श्री नटराज मार्केटींग	स्टूल	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	५०	२३०	-	११५००
३५.	श्री नटराज मार्केटींग	मास्टर ट्रे २२	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	५०	६०	-	३०००
३६.	श्री नटराज मार्केटींग	मग १ लिटर	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१७	१००	-	१७००
३७.	श्री नटराज मार्केटींग	बकेट	जी.जी. कॉलेज कोविड-१९ आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१०	२२०	-	२२००
३८.	श्री नटराज मार्केटींग	ड्रम ६० लिटर (कचरा साठवण्यासाठी	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	५०	४९१.५५	१८%	२९००१
३९.	श्री नटराज मार्केटींग	प्लास्टीक डोअरमॅट (संडास बाथरुम पायपुसणे)	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	१७/०७ /२०२०	१९७ चौ.फुट	५०	१८%	११६२३
४०.	जलाराम प्लास्टीक	इको ग्रीन गारबेज बॅग	जी.जी. कॉलेज कोविड-१९	२३/०७/ २०२०	५५ kg	१४०	-	७७००

अ क्र	पुरवठादाराचे नाव	साहित्याचा तपशील	साहित्य वापर केलेले ठिकाण	साहित्य पुरवलेले दिनांक	खरेदी केलेले - नग	मुळ किंमत	जी. एस.टी	एकुण रक्कम
			आयसोलेशन केंद्र					
४१.	ग्रीन वर्ल्ड	टॉयलेट क्लिनर	वरुण इंडस्ट्री आयसोलेशन केंद्र	२९/०७/२०२०	१०० लिटर	१०० प्रती लिटर	१८%	११८००
४२.	कम्प्युटर स्पॉट	वाईट बोर्ड	मा. आयुक्त दालन	२०/०८/२०२०	१	३०००	-	३०००
४३.	कम्प्युटर स्पॉट	डस्टर	मा. आयुक्त दालन	२०/०८/२०२०	२	१२०	-	२४०
४४.	कम्प्युटर स्पॉट	वाईट बोर्ड मार्कर	मा. आयुक्त दालन	२०/०८/२०२०	४	२५	-	१००

	श्री समर्थ कृपा	१९६००
	कम्प्युटर स्पॉट	३३४०
	जलाराम प्लास्टीक	३१८४५
	श्री नटराज मार्केटींग	१३४१५१.८५
	श्री जिवदानी ॲडव्हरटायझिंग	९९१२०
	ग्रीन वर्ल्ड	११८००
	सातेरी बद्रखली डिस्ट्रीब्युटर	४१५०
	श्री पद्मावती प्लास्टीक	३३९८
	एकुण	३,०७,४०५/-

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत रुग्णालय स्टेशनरी खरेदी व वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत रुग्णालय स्टेशनरी छपाई या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त पूरवठादारांनी कोविड-१९ आयसोलेशन साठी पूरविलेल्या साहित्याची बीलाची संबधीत पूरवठा दारांना अदा करण्यासं महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ३,०७,४०५/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजने करिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील नमुद साहित्य विना ई निविदा खरेदी करणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार आयसोलेशन केंद्राकरिता साहित्य खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. ३,०७,४०५/- (अक्षरी रुपये तीन लक्ष सात हजार चारशे पास मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८७

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:-२९/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिके अंतर्गत बेघर निवारा केंद्र वालीव येथे सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत वालीव येथे रात्र निवारा केंद्र चालू करण्यात आले आहे. संदर्भ क्र. २ नुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वालीव येथे रात्र निवारा केंद्रावर सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणेबाबत मागणी संबंधित विभागाकडून प्राप्त झाली आहे. सदर ठिकाणी वसई विरार शहरातील बेघर नागरीकांना ठेवण्यात येणार आहे. त्यांची सि.सि.टि.व्ही तर्फे निगराणी करणे आवश्यक असून सदर बाब अत्यावश्यक असल्याने बेघर निवारा केंद्र वालीव अंतर्गत सि.सि.टि.व्ही बसविणे गरजेचे आहे.

सदर ठिकाणी खालील दिलेल्या तक्त्यानुसार एकुण सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणे कामीच्या साहीत्याचा तपशिल नमुद आहे.

अ.क्र.	साहीत्याचे नाव	नग	प्रति नग अंदाजित रक्कम (सर्व करांसहीत	एकुण अदांजित रक्कम रुपये
१	IP Dome Camera	10	3700/-	37000/-
२	IP Bullet Camera	5	4500/-	22500/-
३	१६ PORT NVR/DVR	1	21000/-	21000/-
४	४TB HDD	2	16000/-	32000/-
५	२४ PORT POE Switch	1	16000/-	16000/-
६	PVC Casing WIRING with Installation and Labour Charges	1220 mtr	85/-	103700/-
७	४U Rack	1	4200/-	4200/-
८	UPS Inverter	1	28000/-	28000/-
९	३२ inch TV Monitor	1	14500/-	14500/-
१०	HDMI Cable (१० Meter)	1	550/-	550/-
११	RJ४५ Connector/BNC Connector	36	5/-	180/-
१२	Spike Guard	1	700/-	700/-
			एकुण	2,80,330/-

तक्ता क्र. २ नुसार वरील ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरा व संपुर्ण यंत्रणा कार्यान्वीत करणेकरीता व त्याची देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रति नग तपशिल वरील प्रमाणे आहे.

तरी सी.सी.टी.व्ही व अनुषंगिक यंत्रणा बसविणेकामी अंदाजित रक्कम रु. २,८०,३३०/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च लेखासांकेतांक क्रं.०४१-४१७२-२ संगणकीय व्यवस्थापन खर्च/ संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल. तरी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दरपत्रके मागवून एजन्सी नियुक्त करणेकामी व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिके अंतर्गत बेघर निवारा केंद्र वालीव येथे सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणे कामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष' या लेखाशिर्षा अंगतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.) 4/10/2020
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४८८

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २९/१०/२०२०

प्रस्तावाचा विषय:- मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या दैनंदीन कामकाजांसाठी ऑल-इन-वन संगणक खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालयात मा. अतिरिक्त आयुक्त यांना दैनंदीन कामकाजासाठी तसेच बायोमेट्रिक, GEO Tagging, फेसबुक, ट्विटर, इन्स्ट्राग्राम, मेडीकल इन्वेटरी मॅनेजमेंट सिस्टम इत्यादींच्या मॉनिटरींग करणे करीता ऑल-इन-वन संगणकची आवश्यकता आहे.

त्याअनुषंगाने मा. अतिरिक्त आयुक्त यांचे निर्देशान्वये कार्यालयीन कामांकरीता ऑल-इन-वन संगणकाची आवश्यकता असून सदर ऑल-इन-वन संगणकचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	साहित्याचे नाव/ तपशिल	प्रमाण	प्रति नग अंदाजित रक्कम (सर्व करांसहीत)	एकुण अंदाजित रक्कम
१	संगणक (ALL IN ONE) INTEL I5 10th gen, processor 8GB, DDR4 RAM, 1TB HDD, OS Win 10, DVD writer, 23.8" DISPLAY, 3 year onsite warranty	१	५८,०००/-	५८,०००/-

तरी सदर एक ऑल-इन-वन संगणक खरेदी करणे कामी रक्कम रु.५८,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२-१, संगणकीय साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल. तरी उपरोक्त कामासाठी दरपत्रक मागवुन ऑल-इन-वन संगणक खरेदी करणेकामी व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या दैनंदीन कामकाजांसाठी ऑल-इन-वन संगणक खरेदी करणेकामी व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील 'संगणकीय साहित्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत करता येईल.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका